॥ ५५१३ ॥ ठेवूनियां भाव वळ पायीं । देव तई सन्निध ॥ १ ॥ तोचि एक आला साह्य । अशुभ होय शुभाचि ॥ २ ॥ धरिलें तें होय चित्तीं । सर्व शक्ति सिद्धाचि ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाणावाण । लाभ दुणे साधती ॥ ४ ॥

॥ ५५१४ ॥ न भरे पोट न मिळे खाया । जाय वांयां तें करी ॥ १ ॥ सांडुनियां कर्म धर्म । व्यर्थ श्रम करितसे ॥ २ ॥ नाना उपाय द्रव्यासाठीं । करी आटी आर्जव ॥ ३ ॥ तुका ह्मणे नेणे वर्म । जोडी कर्म पातक ॥ ४ ॥

॥ ५५१५ ॥ बरवा हा छंद । वसे वाचेसी गोविंद ॥ १ ॥ बहु साधनाची आटी । बुडूं नको न मिळे सृष्टि ॥ २ ॥ बुद्धि साह्य तरी । बोलामाजी जोडे हरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे वळ । नाहीं तात्काळाचि फळ ॥ ४ ॥

॥ ५५१६ ॥ भविष्य ओढवलया माथां । भजन न घलीं सर्वथा ॥ १ ॥ जो अंगा आला भोग । भाग साहि सोसा रोग ॥ २ ॥ भार असावें निमित्य । माथां एकाचिया सत्य ॥ ३ ॥ तुका ह्मणे बहु काळ । करी साह्य श्रीगोपाळ ॥ ४ ॥

॥ ५५१७ ॥ सरती विठ्ठला । सोस ज्याचा अवघा गेला ॥ १ ॥ शिण झाला नकळे । सोसें झांकियेले डोळे ॥ २ ॥ सिंधुपायवाट । संसारभ्रम सपाट ॥ ३ ॥ तुका ह्मणे सरे वेळ । सानि ह्मणावा विठ्ठल ॥ ४ ॥

॥ ५५१८ ॥ आलंकार लेणें तुळसी भुषणें । टिळे मुद्रा लेणें वैष्णवांचें ॥ १ ॥ वेळोवेळां चिंती गोपाळांचे पाय । सकळ उपाय साध्य होती ॥ २ ॥ सोज्वळ मारग येणें वळें सोपा । नाहीं कोठें गुंपा रामनामीं ॥ ३ ॥ लांगुलें तारिलीं पालाणुनी सिंधु । गोपाळासी वेधु हरिनामीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसे ब्रह्मांड उदरीं । कितेक उद्धरी एक्या नामें ॥ ५ ॥

॥ ५५१९ ॥ सर्व पक्षीं झाला हरिख । परम सुख बोललें ॥ १ ॥ नव्हतीसी झाली झोंप । रविदीप प्रकाश ॥ २ ॥ ज्ञानचक्षु सद्गुरूरूपा ॥ तिन्ही तापा निववी ॥ ३ ॥ तुका ह्मणे तैसी कथा । नाशी व्यथा भवाची ॥ ४ ॥

॥ ५५२० ॥ आणीक एक तया घरीं । दोषा उरी नसेचि ॥ १ ॥ नाहीं थोर सानें परी । वर्ते येरीसारिखें ॥ २ ॥ समब्रह्म ह्मणती मुखें । करी हरिखें पापासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे सांगूं काय । नाहीं सोय धर्माची ॥ ४ ॥

॥ ५५२१ ॥ नरक घोर तरावया । एक सांगतों उपाया ॥ करी करवी तया । साधन उपाय असे हा ॥ १ ॥ शिवपूजा विष्णुस्मरण । गोदान हरिचिंतन ॥ गो इंद्रियें कृष्णार्पण । या नांव दान गाईचें ॥ २ ॥ विवेक वैराग्य अनुताप । विघ्ननाशी सूर्यजप ॥ गायत्री मंत्र सुखरूप । ब्राह्मणाचा स्वधर्म ॥ ३ ॥ दानामाजी अन्नदान । श्रीरामकृष्ण कीर्तन ॥ याहुनी नसे साधन । करा भजन देवाचें ॥ ४ ॥ भवभयत्राता जगद्गुरु । साचे कृपें चुके अघोर ॥ तुका म्हणे अपार । करुणाकरें तारिले ॥ ५ ॥

॥ ५५२२ ॥ अनेक दुःखांची राशी । भोगितां उपाय सुटायासी ॥ नाहीं ठाव विश्रांतीसी । काय कैंची साधनें ॥ १ ॥ अघोर असे संसार । भवसिंधु हा दुस्तर ॥ उतरावा साचार । पैल तीर लवलाहें ॥ २ ॥ नाहीं तरी बरें नाहीं । येथें सुटि जेसें कांहीं ॥ करी काढावा जळतां पाहीं । फावलें घेई काढोनी ॥ ३ ॥ तांबियाची तप्त मेदिनी । यमपाश घात भडाग्नी ॥ काकचांचुतीक्ष्णीं । तडतडां तोडिती ॥ ४ ॥ अग्निकुंड खांब जळती । सांडसावरी तोडीती ॥ काळ नदीचा अंत । नलगेचि ॥ ५ ॥ तैलपाक विंगळाचे । श्वानवन कंटकाचें ॥ नांव नसे दयेचें । प्राणियासी जाचीतां ॥ ६ ॥ सद्गुरूनामाचें अंजन । लेउनी करावें स्मरण ॥ तुका ह्मणे तारी पूर्ण । मीत नाहीं जीवासी ॥ ७ ॥

---

## जनांस शिक्षा.

॥ ५५२३ ॥ सुखें वोळंब दावी गोहा । माझें दुःख नेणा पाहा ॥ १ ॥ आवडीचा मारिला वेडा । होय होय कैसा ह्मणे भिडा ॥ २ ॥ निपट मज न चले । अन्न पातली गहूं सांजा तिन ॥३॥ गेले वारीं आणिली साकर । सात दिवसा दाहा शेर ॥ ४ ॥ अखंड मज पोटाची व्यथा । दुधभात साकर पथ्या ॥ ५ ॥ दो पाहारा मज लहरी येती । शुद्ध नाहीं पडे सुपती ॥ ६ ॥ नीज नये घाली फुलें । जवळीं न साहती मुलें ॥ ७ ॥ अंगीं चंदन

लाविते भाळीं । सदा शूळ माझे कपाळीं ॥ ८ ॥ हाड गळोनि आलें मास । माझें दुःख तुह्मां नेणवे कैसें ॥ ९ ॥ तुका ह्मणे जिता गाढव केला । मेलियावरि नरका गेला ॥ १० ॥

॥ ५५२४ ॥ तेलनीशीं रुसला वेडा । रागें कोरडें खातो भिडा ॥ १ ॥ आपुलें हित आपण पाही । संकोच तो न धरी कांहीं ॥ २ ॥ नावडे लोकां टाकिला गोहो । बोडिलें डोकें सांडिला मोहो ॥ ३ ॥ शेजारणीच्या गेली रागें । कुतऱ्यांनीं घर भरिलें मागें ॥ ४ ॥ पिसारागें भाजिलें घर । नागविलें तें नेणे फार ॥ ५ ॥ तुका ह्मणे वांच्या रागें । फेडिलें सोंवळें देखिलें जगें ॥ ६

॥ ५५२५ ॥ सदा तळमळ । चित्ताचिये हळहळ ॥ १ ॥ त्याचें दर्शन न व्हावें । शव असतां तो जिवे ॥ २ ॥ कुशब्दाची घाणी । अमंगळविली वाणी ॥ ३ ॥ नेणे शब्द पर । तुका ह्मणे परउपकार ॥ ४ ॥

॥ ५५२६ ॥ आशाबद्ध जन । काय जाणे नारायण ॥ १ ॥ करी इंद्रियांची सेवा । पाहे आवडीचा हेवा ॥ २ ॥ भ्रमलें चावळे । तैसें उचित न कळे ॥ ३ ॥ तुका ह्मणे विषें । अन्न नाशियेलें जैसें ॥ ४ ॥

॥ ५५२७ ॥ बाईल सवाशिण आई । आपण पितरांचे ठायीं ॥ १ ॥ थोर वेच झाला नष्टा । आवघ्या अपसव्य चेष्टा ॥ २ ॥ विषयांचे चरवणीं । केली आयुष्याची गाळणी ॥ ३ ॥ तुका म्हणे लंडा । नाहीं दया देव धोंडा ॥ ४ ॥

॥ ५५२८ ॥ दानें कांपे हात । नावडे तेविशीं मात ॥ १ ॥ कथी चावटीचे बोल । हिंग क्षीरीं मिथ्या फोल ॥ २ ॥ न वजती पाय । तीर्थी म्हणे वेचूं काय ॥ ३ ॥ तुका म्हणे मनीं नाहीं । न ये आकारातें कांहीं ॥ ४ ॥

॥ ५५२९ ॥ आहाकटा त्याचे करिती पितर । वंशीं दुराचार पुत्र झाला ॥ १ ॥ गळोंचि ना गर्भ नव्हेचि कां वांज । माता त्याचि लाज लावा पापी ॥ २ ॥ परपींडे परद्वारीं सावधान । सादरचि मन अभाग्याचें ॥ ३ ॥ न मिळतां निंदा चाहडी उपवास । संग्रहावे दोष सकळही ॥ ४ ॥ परउपकार पुण्य त्या वावडें । विषाचें तें कीडें दुर्ग्धीं मरे ॥ ५ ॥ तुका ह्मणे विटाळाचीच तो मूर्ति । दया क्षमा शांति नातळे त्या ॥ ६ ॥

॥ ५५३० ॥ श्वान शीघ्रकोपी । आपणा घातकर पापी ॥ १ ॥ नाहीं भीड आणि धीर । उपदेश न जिरे क्षीर ॥ २ ॥ माणसांसि भुंके । विजातीनें घावे थुंके ॥ ३ ॥ तुका ह्मणे चित्त । मळिण करा तें फजित ॥ ४ ॥

॥ ५५३१ ॥ देखोनि हरखली अंड । पुत्र झाला ह्मणे रांड ॥ तंव तो झाला भांड । चाहाड चोर शिंदळ ॥ १ ॥ जाय तिकडे पिडी लोकां । जोडी भांडवल थुंका ॥ थोर झाला चुका । वर कां नाहीं घातली ॥ २ ॥ भूमि कांपे त्याच्या भारें । कुंभपाकाची शरीरें ॥ बोले निष्ठुर उत्तरें । पापदृष्टि मळिणचित्त ॥ ३ ॥ दुराचारी तो चांडाळ । पाप सांगातें विटाळ । तुका ह्मणे खळ । ह्मणोनियां निषिद्ध तो ॥ ४ ॥

॥ ५५३२ ॥ बोलायाचा त्यासीं । नको संबंध मानसीं ॥ १ ॥ जया घडली संतानिंदा । तुज विसरूनि गोविंदा ॥ २ ॥ जळो त्याचें तोंड । नको दृष्टीपुढें भांड ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । तया दुरी मज ठेवा ॥ ४ ॥

॥ ५५३३ ॥ कंठीं कृष्णमणी । नाहीं अशुभ ते वाणी ॥ १ ॥ हो कां नर अथवा नारी । रांड तये नांवें खरी ॥ २ ॥ नाहीं हातीं दान । शूरपणाचें कांकण ॥ ३ ॥ बोलियेली संतीं । केली बोडोनी फजिती ॥ ४ ॥ तुका म्हणे ताळा । नाहीं त्याची अवकळा ॥ ५ ॥

॥ ५५३४ ॥ व्याल्याविण करी शोभनतांतडी । चार ते गधडी करीतसे ॥ १ ॥ कासया पाल्हाळा आणिकांचे देखी । सांगतां नव्हे सुखी साखरेसि ॥ २ ॥ कुंथाच्या ढेकरें न देवेल पुष्टी । रूप दावी कुष्टी मळिण वरी ॥ ३ ॥ तुका म्हणे अरे वाचाळ हो ऐका । अनुभवेंविण नका वाव घेऊं ॥ ४ ॥

॥ ५५३५ ॥ देखोनी पुराणिकाची दाढी । रडे फुंदें नाक ओढी ॥ १॥ प्रेम खरें दिसे जनां । भिन्न अंतरीं भावना ॥ २ ॥ आवरितां नावरे । खुर आठवी नेवरे ॥ ३ ॥ बोलों नये मुखावाटां । ह्मणे होतां सांचा तोटा ॥ ४॥ दोन्ही सिंगें चारी पाय । खुणा दावी ह्मणे होय ॥ ५ ॥ मना आणितां बोकड । मेला त्याची चरफड ॥ ६ ॥ होता भाव पोटीं । मुखा आलासे शेवटीं ॥ ७ ॥ तुका ह्मणे कुडें । कळों येतें तें रोकडें ॥ ८ ॥

॥ ५५३६ ॥ अतिवादी नव्हे शुद्धया बीजाचा । ओळखा जातीचा असंज तो ॥ १ ॥ वेद श्रुति नाहीं ग्रंथ ज्या प्रमाण । श्रेष्ठाचें वचन न

मानी जो ॥ २ ॥ तुका ह्मणे मद्यपानाचें मिष्टान्न । तैसा तो दुर्जन शिवों नये ॥ ३ ॥

॥ ५५३७ ॥ शिंदळा साल्याचा नाहीं हा विश्वास । बाईल तो त्यास न विसंबे ॥ १ ॥ दुष्ट बुद्धि चोरी करी निरंतर । तो ह्मणे इतर लोक तैसे ॥ २ ॥ तुका ह्मणे जया चित्तीं जे वासना । तयाची भावना तयापरी ॥ ३ ॥

॥ ५५३८ ॥ जवळी नाहीं चित्त । काय मांडियेलें प्रेत ॥ १ ॥ कैसा पाहे चर्मदृष्टि । दीप स्नेहाच्या शेवटीं ॥ २ ॥ कांतेलेंसें श्वान । तैसें दिशा हिंडे मन ॥ ३ ॥ तोचि कानीं होणे । कोण बोंब तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ५५३९ ॥ छळी विष्णुदासा कोणी । त्याची अमंगळ वाणी ॥ १ ॥ येऊं न द्यावा समोर । अभागी तो दुराचार ॥ २ ॥ नावडे हरिकथा । त्याची व्यभिचारिण माता ॥ ३ ॥ तुका ह्मणे याति । भ्रष्ट तयाची ते मति ॥ ४ ॥

॥ ५५४० ॥ मांडवाच्या दारा । पुढें आणिला ह्मातारा ॥ १ ॥ ह्मणे नवरी आणा रांड । जाळा नवऱ्याचें तोंड ॥ २ ॥ समय न कळे । काय उपयोगीं ये वेळे ॥ ३ ॥ तुका ह्मणे खरा । येथुनियां दूर करा ॥ ४ ॥

॥ ५५४१ ॥ कांहीं नित्य नेमाविण । अन्न खाय तोचि श्वान ॥ वांयां मनुष्यपण । भार वाहे तो वृषभ ॥ १ ॥ त्याचा होय भूमी भार । नेणे यातीचा आचार ॥ झाला दावेदार । भोगवी अघोर पितरांसी ॥ २ ॥ अखंड अशुभ वाणी । खरें न बोलेचि स्वप्नीं ॥ पापी तयाहुनी । आणिक नाहीं दुसरा ॥ ३ ॥ पोट पोसी एकला । भूतीं दया नाहीं ज्याला ॥ पाठीं लागे आल्या । अतिताचे दाराशीं ॥ ४ ॥ कांहीं संतांचें पूजन । न घडे तीर्थांचें भ्रमण ॥ यमाचा आंदण । सीण थोर पावेल ॥ ५ ॥ तुका ह्मणे सांनीं । मनुष्यपणा केली हानी ॥ देवा विसरूनी । गेलीं म्हणतां मी माझें ॥ ६ ॥

॥ ५५४२ ॥ आणिकांच्या कापिती माना । निष्ठुरपणा पार नाहीं ॥ १ ॥ करिती वेटे उसणवारी । यमपुरी भोगावया ॥ २ ॥ सेंदराचें दैवत केलें । नवस बोले तयासि ॥ ३ ॥ तुका म्हणे नाचति पोरें । खोडितां येरें अंग दुखे ॥ ४ ॥

॥ ५५४३ ॥ जेणें मुखें स्तवी । तोंचि निंदेपाठीं लावी ॥ १ ॥ ऐसी अधमाचि याती । लोपी सोनें खाय माती ॥ २ ॥ गुदद्वारा वाटे । मिष्टान्नाचा नरक लोटे ॥ ३ ॥ विंचू लाभाविण । तुका म्हणे वाहे शीण ॥ ४ ॥

॥ ५५४४ ॥ अधमाची यारी । रंग पतंगाचे परी ॥ १ ॥ विटे न लगतां क्षण । मोल जाय वांयांविण ॥ २ ॥ सर्पाचिया परी । विषें भरला कल्हारीं ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । मज झणी ऐसे दावा ॥ ४ ॥

॥ ५५४५ ॥ आणिकांच्या घातें । ज्यांचीं निवतील चित्तें ॥ १ ॥ ते चि ओळखावे पापी । निरयवासी शीघ्रकोपी ॥ २ ॥ कान पसरोनी । ऐके वदे दुष्ट वाणी ॥ ३ ॥ तुका म्हणे भांडा । धीर नाहीं ज्याच्या तोंडा ॥ ४ ॥

॥ ५५४६ ॥ धिग जीणें तो बाईले आधीन । परलोक मान नाहीं दोन्ही ॥ १ ॥ धिग जीणें ज्याचें लोभावरी मन । अतीतपूजन घडेचि ना ॥ २ ॥ धिग जीणें आळस निद्रा जया फार । अमित आहार अघोरिया ॥ ३ ॥ धिग जीणें नाहीं विवेक वैराग्य । झुरे मानालागीं साधुपणा ॥ ४ ॥ तुका ह्मणे धिग ऐसे झाले लोक । निंदक वादक नरका जाती ॥ ५ ॥

॥ ५५४७ ॥ कैसा सिंदळीचा । नव्हे ऐसी ज्याची वाचा ॥ १ ॥ वाचे नुच्चारी गोविंदा । सदा करी परनिंदा ॥ २ ॥ कैसा निरयगांवा । जाऊं न पवे विसांवा ॥ ३ ॥ तुका ह्मणे दंड । कैसा न पवे तो लंड ॥ ४ ॥

॥ ५५४८ ॥ गर्भाचें धारण । तिनें वागविला सिण ॥ १ ॥ व्याली कुऱ्हाडीचा दांडा । वरग घलीच तोंडा ॥ २ ॥ उपजला काळ । कुळा लाविला विटाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे जाय । नरका अभक्तांची माय ॥ ४ ॥

॥ ५५४९ ॥ जातो वाराणसी । निरवी गाई घोडे ह्मैसी ॥ १ ॥ गेलों येतों नाहीं ऐसा । सत्य मानावा भरंवसा ॥ २ ॥ नका कादूं माझीं पेवें । तुह्मीं बरळा भूस खावें ॥ ३ ॥ भिकारियाचे पाठीं । तुह्मी घेउनि लागा काठी ॥ ४ ॥ सांगाल जेवाया ब्राह्मण । तरी कापाल माझी मान ॥ ५ ॥ वोकालिया वोका । म्यां खर्चिला नाहीं रुका ॥ ६ ॥ तुह्मी खावें ताकपाणी । जतन करा तूपलोणी ॥ ७ ॥ नाहीं माझे मनीं । पोरें रांडा नागवणी ॥ ८ ॥ तुका ह्मणे नीट । होतें तैसें बोले स्पष्ट ॥ ९ ॥

॥ ५५५० ॥ गाढवाचे अंगीं चंदनाची उटी । राखेसवें भेटी केली तेणें ॥ १ ॥ सहज गुण जयाचे देहीं । पालट कांहीं नव्हे तया ॥ २ ॥ माकडाचे गळां मोलाचा मणि । घातला चावुनी टाकी थुंकोनि ॥ ३ ॥ तुका ह्मणे खळा नावडे हित । अविद्या वाढवी आपुलें मत ॥ ४ ॥

॥ ५५५१ ॥ आमचा विनोद तें जगा मरण । करिती भावहीन देखावेखी ॥ १ ॥ नकळे संतत हिताचा विचार । तों हे दारोदार खाती फेरे ॥ २ ॥ वंदिलें वंदावें निंदिलें निंदावें । एक गेलें जावें त्याचि वाटा ॥ ३ ॥ तुका ह्मणे कोणी नाइके सांगतां । होती यमदूता वरपडे ॥ ४ ॥

॥ ५५५२ ॥ संत मागे पाणी नेदी एक चुळी । दासीस आंघोळी ठेवी पाणी ॥ १ ॥ संतासी देखोनी होय पाठमोरा । दासीचिया पोरा चुंबन देतो ॥ २ ॥ संतासी देखोनि करितो ढवाळ्या । भावें धुतो चोळ्या दासीचिया ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याच्या तोंडावरी थुंका । जातो यमलोका भोगावया ॥ ४ ॥

॥ ५५५३ ॥ सोइरियासि करी पाहुणेरु बरा । काढितो ठोंबरा संतांलागीं ॥ १ ॥ गाईसि देखोनि बदबदा मारी । घोड्याची चाकरी गोड लागे ॥ २ ॥ पानफुल वेश्येसी नेतसे उदंड । देखों नेदी खांड ब्राह्मणसी ॥ ३ ॥ बाइलेच्या गोता आवडिनें पोसी । माता पितयासी दवडितो ॥ ४ ॥ तुका म्हणे थुंका त्याच्या तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ॥ ५ ॥

॥ ५५५४ ॥ नाहीं निर्मळ जीवन । काय करिल साबन ॥ १ ॥ तैसी चित्तशुद्धि नाहीं । तेथें बोध करिल काई ॥ २ ॥ वृक्ष न धरी पुष्पफळ । काय करी वसंतकाळ ॥ ३ ॥ वांजे न होती लेकरें । याय करावें भ्रतारें ॥ ४ ॥ नपुंसक पुरुषांसी । काय करील बाईल त्यासी ॥ ५ ॥ प्राण गेलीया शरिर । काय करील व्यवहार ॥ ६ ॥ तुका ह्मणे जिवनेंविण । पीक नव्हे नव्हे जाण ॥ ७ ॥

॥ ५५५५ ॥ करी संध्या स्नान । वारी खाऊनीयां अन्न ॥ १ ॥ तया नाहीं लाभहानी । आदा वेंचाचिये मानीं ॥ २ ॥ मजुराचें धन । विळा दोराचें जतन ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं । अर्थीरासी देव कांहीं ॥ ४ ॥

॥ ५५५६ ॥ वाखर घेऊनि आलें । त्यासी तरवारेनें हालें ॥ १ ॥ नव्हे आपुलें उचित । करुनि टाकावें फजित ॥ २ ॥ अंगुळिया मोडी ।

त्यासी काय सिलें थोडीं ॥ ३ ॥ नपुंसकासाठीं । तुका ह्मणे नलगे जेठी ॥ ४ ॥

॥ ५५५७ ॥ आधींच आळशी । वरी गुरुचा उपदेशी ॥ १ ॥ मग कैंची आडकाठी । विधिनिषेधाची भेटी ॥ २ ॥ नाचरवे धर्म । न करवे विधिकर्म ॥ ३ ॥ तुका ह्मणे ते गाढव । घेती मनासवें धांव ॥ ४ ॥

॥ ५५५८ ॥ शूकरासी विष्टा माने सावकास । मिष्टान्नाची त्यास काय गोडी ॥ १ ॥ तेवीं अभक्तांसी आवडे पाखांड । न लगे त्यां गोड परमार्थ ॥ २ ॥ श्वानासी भोजन दिलें पंचामृत । तरी त्याचें चित्त हाडावरि ॥ ३ ॥ तुका ह्मणे सर्पा पाजिलिया क्षीर । वमितां विखार विष झालें ॥ ४ ॥

॥ ५५५९ ॥ रासभ धुतला महा तीर्थामाजी । नव्हे जैसा तेजी शामकर्ण ॥ १ ॥ तेवीं खळा काय केला उपदेश । नव्हेचि मानस शुद्ध त्याचें ॥ २ ॥ सर्पासी पाजिलें शर्करापीयूष । अंतरींचें विष जाऊं नेणे ॥ ३ ॥ तुका ह्मणे श्वाना क्षिरीचें भोजन । सवेंचि वमन जेंवीं तया ॥ ४ ॥

॥ ५५६० ॥ जेवीं नवज्वरें तापलें शरीर । लागे तया क्षिर विषतुल्य ॥ १ ॥ तेंवी परमार्थ जीहीं दुराविला । तयालागीं झाला सन्निपात ॥ २ ॥ कामिनी जयाच्या जाहली नेत्रासी । देखी तो चंद्रासी पीतवर्ण ॥ ३ ॥ तुका ह्मणे मद्यपानाची आवडी । न रुचे त्या गोडी नवनीताची ॥ ४ ॥

॥ ५५६१ ॥ आह्मां हें कौतुक जगा द्यावी नीत । करावे फजित चुकती ते ॥ १ ॥ कासयाचा बाध एकाच्या निरोपें । काय व्हावें कोपें जगाचिया ॥ २ ॥ अविद्येचा येथें कोठें परिश्रम । रामकृष्णनाम ऐसे बाण ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें खऱ्याचा विकार । न सरती येरा खोट्या परी ॥ ४ ॥

॥ ५५६२ ॥ दर्पणासी नखटें लाजे । शुद्ध खिजे देखोनि ॥ १ ॥ ऐसें अवगुणांच्या बाधें । दिसे सुदें विपरीत ॥ २ ॥ अंधळ्यास काय हिरा । गारांचि तो सारिखा ॥ ३ ॥ तुका ह्मणे भुंके सुनें । ठाया नेणे ठाव तो ॥ ४ ॥

॥ ५५६३ ॥ कामातुर चवी सांडी । बरळ तोंडीं बरळे ॥ १ ॥ रंगलें तें अंगीं दावी । विष देववी आसाडे ॥ २ ॥ धनलोभें लागे वेड । ते बडबड शमेना ॥ ३ ॥ तुका ह्मणे वेसनें दोन्ही । नर्कखाणी भोगावया ॥ ४ ॥

॥ ५५६४ ॥ वरगासाटीं खादलें शेण । मिळतां अन्न न सेंडी ॥ १ ॥ फजित तो केला लाहे । ताडण साहे गौरव ॥ २ ॥ ओढाळाची ऑंगळ ओढी । उगी खोडी नवजाय ॥ ३ ॥ तुका फजीत करी बुच्या । विसरे कुच्या खोडी तेणें ॥ ४ ॥

॥ ५५६५ ॥ जातो न येतिया वाटा । काय निरवितो करंटा ॥ १ ॥ कैसा झालासे बेश्रम । लाज नाहीं न ह्मणे राम ॥ २ ॥ पाहे वैरियाकडे । डोळे वासुनियां रडे ॥ ३ ॥ बांधुनियां यमाहातीं । दिला नाहीं त्याची खंती ॥ ४ ॥ नाहीं यांपें काम । ऐसें जाणे तो अधम ॥ ५ ॥ अझून तरि मुका । कांरे झालासि ह्मणे तुका ॥ ६ ॥

॥ ५५६६ ॥ देखीचा दिमाख शिकोनियां दावी । हिऱ्या ऐसी केवीं गारगोटी ॥ १ ॥ मर्यादा ते जाण अरे अभागिया । देवाच्या ऐसिया सकळ मूर्ति ॥ २ ॥ काय पडिलेंसी लटिक्याचे भरी । वोंवाळुनि थोरीं परतीं सांडीं ॥ ३ ॥ तुका म्हणे पुढें दिसतसे घात । करितों फजित म्हणउनी ॥ ४ ॥

॥ ५५६७ ॥ तेज्या इशारती । तटा फोक वरी घेती ॥ १ ॥ काय सांगावें साहुनी । ऐका रे धरा मनीं ॥ २ ॥ नव्हे भांडखोर । ओढूनि धरूं पदर ॥ ३ ॥ तुका म्हणे तोंड । काळें करा खालीं मुंड ॥ ४ ॥

॥ ५५६८ ॥ मुद्दल जतन झालें । मग लाभाचें काय आलें ॥ १ ॥ घरीं देउनि अंतर गांठी । राखा पारिख्यां न सुटे मिठी ॥ २ ॥ घाला पडे थोडेंच वाटे । काम मंदाचेंच पेटे ॥ ३ ॥ तुका म्हणे वरदळ खोटें । फांसे अंतरिंच्या कपटें ॥ ४ ॥

॥ ५५६९ ॥ सोनें दावी वरी तांबें तयापोटीं । खरियाचेसाठीं विकूं पाहे ॥ १ ॥ पारखी तो जाणे तयाचे जीवींचें । निवडी दोहींचें वेगळाले ॥ २ ॥ क्षीरा नीरा कैसें होय एकपण । स्वादी तोचि भिन्न भिन्न काढी ॥ ३ ॥ तुका ह्मणे थीता नागवलाचि. खोटा । अपमान मोठा पावईल ॥ ४ ॥

॥ ५५७० ॥ गाढवाचें तानें । पालटलें क्षणक्षणें ॥ १ ॥ तैसे अधमाचे गुण । एकविध नाहीं मन ॥ २ ॥ उपजतां बरें दिसे । रूप वाढतां तें नासे ॥ ३ ॥ तुका ह्मणे भुंकते वेळे । वेळ अवेळ न कळे ॥ ४ ॥

॥ ५५७१ ॥ विचार नाहीं नर खर तो तैसा । वाहे ज्ञान पाठीं भार लगड तैसा ॥ १ ॥ वादावाद करणें त्यासी तोंच वरी । गुखाडीची चाड सरे तों च बाहेरी ॥ २ ॥ सौभाग्यसंपन्न हो कां वृद्ध प्रतिष्ठ । चिकरूनि सांडी पायां लागली ते विष्ठ ॥ ३॥ नाहीं याति कुळ फांसे ओढी तयासी । तुका ह्मणे काय मुद्रासोंग जाळिसी ॥ ४ ॥

॥ ५५७२ ॥ यथार्थ वाद सांडुनि उपचार । बोलती ते अघोर भोगितील ॥ १ ॥ चोरा धरितां सांगे कुठाऱ्याचें नांव । दोघांचेही पाव हात जाती ॥ २ ॥ तुका ह्मणे असे पुराणीं निवाड । माझी हे वढवड नव्हे कांहीं ॥ ३ ॥

॥ ५५७३ ॥ संतापाशीं बहु असावें. मर्यादा । फलकटाचा धंदा उर फोडी ॥ १ ॥ बासर तो भुंके गाढवाचेपरी । उडे पाठीवरि दंड तेणें ॥ २ ॥ समय नेणें तें वेडें चाहाटळ । अवगुणाचा ओंगळ मान पावे ॥ ३ ॥ तुका म्हणे काय वांयां चाळणी । पिट पिट घाणी हागवणेंची ॥ ४ ॥

॥ ५५७४ ॥ ऐसे कुळीं पुत्र होती । बुडविती पूर्वजा ॥ १ ॥ चाहाडी चोरी भांडवला । वांटा आला भागासी ॥ २ ॥ त्याचियानें दुःखी मही । भार तेही न साहे ॥ ३ ॥ तुका म्हणे ग्रामपशु । केला नाशु आयुष्या ॥ ४ ॥

॥ ५५७५ ॥ गांठोळीस धन भाकावी करुणा । दावूनि सज्जना कींव पीडी ॥ १ ॥ नाठेळाची भक्ति कुचराचें बळ । कोरडें वोंगळ मार खाय ॥ २ ॥ सांडोव्यासी घाली देवाची करंडी । विल्हाळत्या धोंडी पूजा दावी ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसे माकडाचे छंद । अवघे धंदधंद सिंदळीचे ॥ ४ ॥

॥ ५५७६ ॥ मोल देऊनियां सांठवावे दोष । नटाचे ते वेष पाहोनियां ॥ १ ॥ हरिदासां मुखें हरिकथाकीर्तन । तेथें पुण्यें पुण्य विशेषता ॥ २ ॥ हरितील वस्त्रें गोपिकांच्या वेषें । पाप सासरिसें मात्रागमन ॥ ३ ॥ तुका ह्मणे पाहा ऐसें झालें जन । सेवाभक्तिहीन रसीं गोडी ॥ ४ ॥

॥ ५५७७ ॥ कुचराचे श्रवण । गुणदोषांवरि मन ॥ १ ॥ असोनियां नसे कथे । मूर्ख आभाग्य तें तेथें ॥२॥ निरर्थक कारणीं । कान डोळे वेची वाणी ॥ ३ ॥ पापाचें सांगती । तोंडीं ओढाळांचे माती ॥ ४ ॥ हिताचिया

नांवें । वोस पडिले देहभावें ॥ ५ ॥ फजीत करूनि सांडी । तुका करी बोडाबोडी ॥ ६ ॥

॥ ५५७८ ॥ काय ह्याचें घ्यावें । निस नित्य कोणें गावें ॥ १ ॥ केलें हरिकथेनें वाज । अंतरोनि जाते निज ॥ २ ॥ काम संसार । अंतरीं है करकर ॥ ३ ॥ तुका ह्मणे हेंड । ऐसे मानिती ते लंड ॥ ४ ॥

॥ ५५७९ ॥ साजे अळंकार । तरि भोगितां भ्रतार ॥ १ ॥ व्यभिचारा टाकमटिका । उपहास होती लोकां ॥ २ ॥ शूरत्वाची वाणी । रूप मिरवे मंडणीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे जिणें । शर्त्तीविण लाजिरवाणें ॥ ४ ॥

॥ ५५८० ॥ लटिकें तें रुचे । साच कोणांही न पचे ॥ १ ॥ ऐसा माजल्याचा गुण । भोगें कळों येइल सीण ॥ २ ॥ वाढवी ममता । नाहीं वरपडला तो दूतां ॥ ३ ॥ कांहीं न मनी हेकड । तुका उपदेशं माकड ॥ ४ ॥

॥ ५५८१ ॥ शाहाणियां पुरे एकचि वचन । विशारती खुण तेचि त्यासी ॥ १ ॥ उपदेश असे वहुतांकारणें । घेतला तो मनें पाहिजे हा ॥ २ ॥ फांसावेना तरीं दुःख घेतें वाव । मग होतो जीव कासावीस ॥ ३ ॥ तुका ह्मणे नको राग धरूं झोंडा । नुघाडितां पीडा होईल डोळे ॥ ४ ॥

॥ ५५८२ ॥ जातिविजातीची व्हावयासि भेटी । संकल्प तो पोटीं वाहों नये ॥ १ ॥ होणार तें घडो होणाराच्या गुणें । होईल नारायणें निर्मिलें तें ॥ २ ॥ व्याघ्राचिये भुके वधावी ते गाय । याचें नांव काय पुण्य असे ॥ ३ ॥ तुका ह्मणे नकरी विचार पुरता । गरज्याची माता पिता खर ॥ ४ ॥

॥ ५५८३ ॥ परस्त्रीतें ह्मणतां माता । चित्त लाजवितें चित्ता ॥ १ ॥ काय वोलोनियां तोंडें । मनामाजी कानकोंडें ॥ २ ॥ धर्मधारिष्टगोष्ठी सांगे । उष्ट्या हातें नुडवी काग ॥ ३ ॥ जें जें कर्म वसे अंगीं । तें तें आठवे प्रसंगीं ॥ ४ ॥ बोले तैसा चाले । तुका ह्मणे तो अमोल ॥ ५ ॥

॥ ५५८४ ॥ तोंडें खाये फार । पादे बोचा करी मार ॥ १ ॥ एक ऐसे ते शाहाणे । आपुले अधीन तें नेणे ॥ २ ॥ कुले घालूनी उघडे । रागें पाहे लोकांकडे ॥ ३ ॥ खेळे द्युतकर्म । मग बोंवली जुलूम ॥ ४ ॥ निजतां आला मोहो । वीतां ह्मणे मेला गोहो ॥ ५ ॥ तुका ह्मणे त्यांनीं । मनुष्यपणा केली हानी ॥ ६ ॥

॥ ५५८५ ॥ संतनिंदा ज्याचे घरीं । नव्हे घर ते यमपुरी ॥ १ ॥ सा ज्या पापा नाहीं जोडा । संगें जना होय पीडा ॥ २ ॥ संतनिंदा आवडे ज्यासी । तो जिताची नर्कवासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे तो नष्ट । जाणा गाढव तो स्पष्ट ॥ ४ ॥

॥ ५५८६ ॥ सुखें न मनी अवगुण । दुःख भोगी त्याचें कोण ॥ १॥ हें कां ठायींचें न कळे । राती करा झांकुनि डोळे ॥ २ ॥ चालोनि आड वाटे । पायीं मोडविले कांटे ॥ ३ ॥ तुका ह्मणे कोणा । बोल ठेवितो शाहाणा ॥ ४ ॥

॥५५८७॥ काय ढोरापुढें घालूनि मिष्टान्न। खरा विलेपन चंदनाचें॥१॥ नको नको देवा खळाची संगति । रस ज्या पंगती नाहीं कथे ॥ २॥ काय सेज बाज माकडा विलास । अळंकारा नास करूनि टाकी ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय पाजूनि नवनीत । सर्पा विष थीत अमृताचें ॥ ४ ॥

॥ ५५८८ ॥ अति झालें उत्तम वेश्येचें लावण्य । परि ते सवासीण न म्हणावी ॥ १ ॥ उचित अनुचित केले ठाया ठाव । गुणां मोलवाव थोरपण ॥ २ ॥ शूरत्वावांचूनि शूरांमाजी ठाव । नाहीं आविर्भाव आणिलिया ॥ ३ ॥ तुका म्हणे सोंग पोटाचे उपाय । कारण कमाईविण नाहीं ॥ ४ ॥

॥ ५५८९ ॥ शूरां साजती हातियारें । गांढ्यां हांसतील पोरें ॥ १ ॥ काय केली विटंबण । मोतीं नासिकावांचून ॥ २ ॥ पतिव्रते रूप साजे । सिंदळ काजळ लेतां लाजे ॥ ३ ॥ दासी पत्नी सुता । नव्हे सरी एक पिता ॥ ४ ॥ मान बुद्धिमंतां । थोर न मनिती पिता ॥ ५ ॥ तुका म्हणे तरी । आंत शुद्ध दंडे वरी ॥ ६ ॥

॥ ५५९० ॥ काय केलें जळचरीं । ढीवर त्यांच्या घातावरी ॥ १ ॥ हा तों ठायींचा विचार । आहे यातिवैराकार ॥ २ ॥ श्वापदातें वधी । निरपराधें पारधी ॥ ३ ॥ तुका म्हणे खळ । संतां पीडिती चांडाळ ॥ ४ ॥

॥ ५५९१ ॥ वाइटानें भलें । हीनें दाविलें चांगलें ॥ १ ॥ एकाविण एका । कैंचें मोल होतें फुका ॥ २ ॥ विषें दाविलें अमृत । कडू गोड घातें हित ॥ ३ ॥ काळिमेनें ज्योती । दिवस कळों आला राती ॥ ४ ॥ उंच निंच गारा । हिरा परिस मोहरा ॥ ५ ॥ तुका ह्मणे भले । ऐसे नष्टांनीं कळले ॥ ६ ॥

॥ ५५९२ ॥ असो खळ ऐसे फार । आह्मां त्यांचे उपकार ॥ १ ॥ करिती पातकांची धनी । मोल न घेतां साबणी ॥ २ ॥ फुकाचे मजुर । ओझें वागविती भार ॥ ३ ॥ पार उतरूं ह्मणे तुका । आह्मां आपण जाती नरका ॥ ४ ॥

॥ ५५९३ ॥ दुष्टाचें चित्त न भिन्ने अंतरीं । जरी जन्मवरी उपदेशिला ॥ पालथे घागरी घातलें जीवन । न धरीच जाण तेंही साला ॥१॥ जन्मा येउनि तेणें पतनचि साधिलें । तमोगुणें व्यापिलें जया नरा ॥ जळो जळो हें त्याचें ज्यालेपण । कासया हें आलें संवसारा ॥ २ ॥ पाषाण जीवनीं असतां कल्पवरी । पाहातां अंतरीं कोरडा तो ॥ कुचर मुग नयेचि पाका । पाहतां सारिखा होता तैसा ॥ ३ ॥ तुका ह्मणे असे उपाय सकळां । न चलेया खळा प्रयत्न कांहीं । ह्मणऊनि संग न करितां भला । धरितां अबोला सर्व हित ॥ ४ ॥

॥ ५५९४ ॥ गातां आइकतां कांटाळा जो करी । वास त्या अघोरीं कुंभपाकीं ॥ १ ॥ रागें यमधर्म जाचविती तया । तुज दिलें कासया मुख कान ॥ २ ॥ विषयांच्या सुखें अखंड जागसी । न वजे एकादशी जागरणा ॥ ३ ॥ वेचूनियां द्रव्य सेवी मद्यपान । नाहीं दिलें अन्न अतीतासी ॥ ४॥ तीर्थाटण नाहीं केले उपकार । पाळिलें शरीर पुष्ट लोभें ॥ ५ ॥ तुका ह्मणे मग केला साहे दंड । नाइकती लंड सांगितलें ॥ ६ ॥

॥ ५५९५ ॥ बोलविसी माझें मुख । परिया जना वाटे दुःख ॥ १ ॥ जया जयाची आवडी । तयालागीं ते चरफडी ॥ २ ॥ कठीण देतां काढा । जल्पे रोगी मेळवी दाढा ॥ ३ ॥ खाऊं नये तेंचि मागे । निवारितां रडूं लागे ॥ ४ ॥ वैद्या भीड काय । अतिसाई जीवें जाय ॥ ५ ॥ नये भीडा सांगों आन । पथ्य औषधा कारण ॥ ६ ॥ धन माया पुत्र दारा । हें तों आवडी नरका थारा ॥ ७ ॥ तुका ह्मणे यांत । आवडे ते करा मात ॥ ८ ॥

॥ ५५९६ ॥ पतिव्रते आनंद मनीं । सिंदळ खोंचे व्यभिचारवचनीं ॥ १ ॥ जळो वर्म लागो आगी । शुद्धपण भलें जगीं ॥ २ ॥सुखपुराणीं आचारशीळा । दुःख वाटे अनर्गळा ॥ ३ ॥ शूरा उल्हास अंगीं । गांढया मरण ते प्रसंगीं ॥ ५ ॥ शुद्ध सोनें उजळे अगी । हीन काळें धांवे रंगीं ॥ ६ ॥ तुका ह्मणे तो चि हिरा । घनवायें निवडे पुरा ॥ ७ ॥

॥ ५५९७ ॥ चाहाडाची माता । व्यभिचारीण तत्वता ॥ १ ॥ पाहे संतांचें उणें । छिद्र छळावया सुनें ॥ २ ॥ जाणों त्याच्या बाचें । कांहीं सोडिलें गांठीचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे घात । व्हावा ऐसी जोडी मात ॥ ४ ॥

॥ ५५९८ ॥ सापें ज्यासी खावें । तेणें प्राणासी मुकावें ॥ १ ॥ काय लाधला दुर्जन । तोंडावरी थुंकी जन ॥ २ ॥ विंचु हाणी नांगी । अन्न लावी आणिकां अंगीं ॥ ३ ॥ तुका म्हणे जाती । नरका पाउलीं चालती ॥ ४ ॥

॥ ५५९९ ॥ काय सर्प खातो अन्न । काय ध्यान बगाचें ॥ १ ॥ अंतरींची बुद्धि खोटी । भरलें पोटीं वाईट ॥ २ ॥ काय उंदीर नाहीं धांवीं । राख लावी गाढव ॥ ३ ॥ तुका ह्मणे सुसर जळीं । काउळीं कां न न्हाती ॥ ४ ॥

॥ ५६०० ॥ आणिकां छळावया झालासी शहाणा । स्वहिता घातलें खानें ॥ आडिके पैके करुनि सायास । कृपणें सांचलें धन ॥ न जिरे क्षीर श्वानासी भक्षितां । याती तयाचा गुण ॥ तारुण्यदशे अधम मातला । दवडी हात पाय कान ॥ १ ॥ काय झालें यांस वांयां कां ठकले । हातीं सांपडलें टाकीतसे ॥ घेऊनि स्फटिकमणि टाकी चिंतामणी । नागवले आपुले इच्छे ॥ २ ॥ सिद्धीं सेविलें सेविती अधम । पात्रासारिखें फळ ॥ सिंपिला मोतीं जन्मलें स्वातीं । वरुषलें सर्वत्र जळ ॥ कापुस पट नये चि कारणा । तयास पातला काळ ॥ तें चि भुजंगें धरिलें कंठीं । मा विष झालें त्याची गरळ ॥ ३ ॥ भक्षूनी मिष्टान्न साकर । सहित सोलूनी केळें ॥ घालूनीयां घसां अंगोळिया । वांति करूं पाहे बळें ॥ कुंथावयाची आवडी बोंबा । उन्हवणीं रडती बाळें ॥ तुका ह्मणे जे जैसें करिती । ते पावती तैसींच फळें ॥ ४ ॥

॥ ५६०१ ॥ चंदनाचे गांवीं सर्पाचीं वसती । भोगिती ते होतीं द्वीपांतरीं ॥ १ ॥ एका ओझें एका लाभ घडे देवा । संचिताचा ठेवा वेगळाला ॥ २ ॥ क्षीराची वसति अशुद्ध सेवावें । जवळी तें जावें भोगें दुरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसी बुद्धि ज्याची जड । त्याहुनि दगड बरे देवा ॥ ४ ॥

॥ ५६०२ ॥ सज्जन तो शब्द सत्य जो मानी । छळी दुर्जन आणिकांसी ॥ १॥ एक गुण तो केला दों ठायीं । ज्याचा त्यास पाहीं जैसा तै-

सा॥ २ ॥ भाविक शब्द बोले वाणीचा । लटिका वाचा वाचाळ तो ॥ ३ ॥ परउपकार घडे तो भला । नाव्याळ तया दया नाहीं ॥ ४ ॥ जाणीवंत तो पायरी जाणे । अधम तो नेणे खुंट जैसा ॥ ५ ॥ हित तें अनहित केलें कैसें । तुका ह्मणे पिसें लागलें यास ॥ ६ ॥

॥ ५६०३ ॥ नावडे ज्यां कथा उठोनियां जाती । ते यमा फावती बरे वोजा ॥ १ ॥ तो असे जवळी गोंचिड्याच्या न्यायें । देशत्यागें ठाय तया दुरी ॥ २ ॥ नव्हे भला कोणी नावडे दुसरा । पाहुणा किंकरा यमा होय ॥ ३ ॥ तुका ह्मणे तया करावें तें कायी । पाषाण कां नाहीं जळामध्यें ॥ ४ ॥

॥ ५६०४ ॥ देहा लावी वात । पालव घाली झाली रात ॥ १ ॥ वेडी ते वेडी बहुतच वेडी । चाखतां गोडी चवी नेणे ॥ २ ॥ कडिये मूल भोवतें भोये । मोकलुनि रडे धाये ॥ ३ ॥ लेंकरें वित्त पुसे जगा । माझा गोहो कोण तो सांगा ॥ ४ ॥ आपुली शुद्धि जया नाहीं । आणिकांची ते जाणे कायी ॥ ५ ॥ तुका ह्मणे ऐसे जन । नर्का जातां राखे कोण ॥ ६ ॥

॥ ५६०५ ॥ यमपुरी त्यांणीं वसाविली जाणा । उच्छेद भजना विधी केला ॥ १ ॥ अवघड कोणी न करी सांगतां । सुलभ बहुतां गोड वाटे ॥२॥ काय ते नेणते होते मागें ऋषी । आधार लोकांसी ग्रंथ केले ॥ ३ ॥ द्रव्य दारा कोणें स्थापियलें धन । पिंडाचें पाळण विषयभोग ॥ ४॥ तुका ह्मणे दोहीं ठायीं हा फजीत । पावे यमदुत जना हातीं ॥ ५ ॥

॥ ५६०६ ॥ वाचे विठ्ठल नाहीं । तोचि प्रेतरूप पाहीं ॥ १ ॥ धिग त्याचें ज्यालेपण । भार न साहे मेदिन ॥२ ॥ न बैसे कीर्तनीं । गुण नाइके जो कानीं ॥ ३ ॥ जाता कांटाळे देउळा । तोचि सुना मुखकाळा ॥ ४॥ हरिभक्तिविण । त्याचें जळो शाहाणपण ॥ ५ ॥ तुका ह्मणे सेणें । वंशा आणियेलें उणें ॥ ६ ॥

॥ ५६०७ ॥ दुर्जनाचा मान । सुखें करावा खंडण ॥ १ ॥ लात हाणोनियां वारी । गुंडा वाट शुद्ध करी ॥ २ ॥ बहुतां पीडी खळ । त्याचा धरावा विटाळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे नखें । काढुनि टाकिजेती सुखें ॥ ४ ॥

॥ ५६०८ ॥ सावित्रीचें विटंबण । रांडपण करीतसे ॥ १ ॥ काय जाळावें तें नांव । अवघें वाव असे तें ॥ २ ॥ कुबेर नांव मोळी वाहे । कैसी पाहे फाजिती ॥ ३ ॥ तुका ह्मणे दुणगुण देखें । उगीं मूर्ख फुंदतां ॥ ४ ॥

॥ ५६०९ ॥ चातुर्याच्या अनंतकळा । सत्या विरळा जाणता ॥ १ ॥ हांसत्यासवें हांसे जन । रडतां भिन्न पालटे ॥ २ ॥ जळो ऐसे वांजट बोल । गुणा मोल भूस मिथ्या ॥३॥ तुका ह्मणे अंधळयाऐसें । वोंगळ पिसें कौतुक ॥ ४ ॥

॥ ५६१० ॥ पुरुषा हातीं कंकणचुडा । नवल दोडा वृत्तिया ॥१॥ पहा कैसी विटंबणा । नारायणा देखिली ॥ २ ॥ जळो ऐसी ब्रिदावळी। भाटवोळीपणाची ॥ ३ ॥ तुका ह्मणे पाहों डोळां । अन्नकळा नये हे ॥ ४ ॥

॥ ५६११ ॥ सेवटासी जरी आलें । तरी झालें आंधळें ॥ १ ॥ स्वहिताचा लेश नाहीं । दगडा कांहीं अंतरीं ॥ २ ॥ काय परिसासवें भेटी । खापरखुंटी झालिया ॥ ३ ॥ तुका म्हणे अधम जन । अवगुणचि वाढवी ॥ ४ ॥

॥ ५६१२ ॥ दुर्जनाचें अंग अवघें चि सरळ । नर्काचा कोथळ सांटवण ॥ १ ॥ खाय अमंगळ बोले अमंगळ । उठवी कपाळ संघष्टणें ॥ २ ॥ सर्पा मंत्र चाले धरावया हातीं । खळाची ते जाती निखळ चि ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं न साहे उपमा । आणीक अधमा वोखव्याची ॥ ४ ॥

॥ ५६१३ ॥ गोविंदा वांचूनी वदे ज्याची वाणी । हगवण घाणी पिटपिट ते ॥ १ ॥ मस्तक सांडूनी सिसफूल गुढघा । चार तो अवघा बावळ्याचा ॥ २ ॥ अंगभूत ह्मणू पूजितो वाहाणा । ह्मणतां शाहाणा येइल कैसा ॥ ३ ॥ तुका ह्मणे वेश्या सांगे सवासिणी । इतर पूजनीं भाव तैसा ॥ ४ ॥

॥ ५६१४ ॥ कुतऱ्या ऐसें ज्याचें जिणें । संग कोणी न करीजे ॥ १ ॥ जाय तिकडे हाडहाडी । गोऱ्हवाडीच सोइरीं ॥ २ ॥ अवगुणांचा त्याग नाहीं । खवळे पाहीं उपदेशें ॥ ३ ॥ तुका ह्मणे कैंची लवी । ठेंग्या कैंवी अंकुर ॥ ४ ॥

॥ ५६१५ ॥ लाडाच्या उत्तरीं वाढविती कळहे । हा तो अमंगळ जातिगुण ॥ १ ॥ तमाचे शरीरीं विटाळ चि वसे । विचाराचा नसे लेश तो ही ॥ २ ॥ कवतुकें घ्यावे लेंकराचे बोल । साहिलिया मोल ऐसें नाहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय उपदेश खळा । न्हाउनि काउळा क्षतें धुंडी॥ ४ ॥

॥ ५६१६ ॥ विष्ठा भक्षी तया अमृत पारिखें । वोंगळाचि सखें वोंगळाचें ॥ १ ॥ नये पाहों कांहीं गोऱ्हवाडीचा अंत । ह्मणी टाका संत दुर्जनापें ॥२॥

भेंसळीच्या बीजा अमंगळ गुण । उपजवी सीण दरुषणें ॥३॥ तुका ह्मणे छी थू जया घरीं धन । तेथें तें कारण कासयाचें ॥ ४ ॥

॥ ५६१७ ॥ चाकरीवांचून । खाणें अनुचित वेतन ॥ १ ॥ धणी काढोनियां निजा । करील ये कामाची पूजा ॥ २ ॥ उचितावेगळें । अभिलाषें तोंड काळें ॥ ३ ॥ सांगे तरी तुका । पहा लाज नाहीं लोकां ॥ ४ ॥

॥ ५६१८ ॥ शादीचें तें सोंग । संपादितां राजा व्यंग ॥ १ ॥ पाहा कैशी विटंबणा । मूर्खा अभाग्याची जना ॥ २ ॥ दिसतें तें लोपी । झिंज्या वोढुनियां पापी ॥ ३ ॥ सिंदळी त्या सती । तुका ह्मणे थुंका घेती ॥ ४ ॥

॥ ५६१९ ॥ भक्त ह्मणऊनि वंचावें जीवें।तेणें शेण खावें काशासाठीं॥१॥ नासिले अडबंद कौपीन ते माळा । अडचण राउळामाजी केली ॥ २ ॥ अंगिकारिले सेवे घडे अंतराय । तया झाला न्याय खापराचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे कोठें तर्गो येती घाणीं । आहाच ही मनीं अधीरता ॥ ४ ॥

॥ ५६२० ॥ गयाळाचें काम हिताचा आवारा । लाज फजितखोरा असत नाहीं ॥ १ ॥ चित्ता न मिळे तें डोळां सलों येतें । असावें परतें जवळूनि ॥ २ ॥ न करावा संग न बोलावी मात । सावधान चित्त नाहीं त्यासी ॥३॥ तुका ह्मणे दुःख देतील माकडें । घालिती सांकडें उफराटें ॥ ४ ॥

॥ ५६२१ ॥ हागिल्याचे सिंके वोणवा चि राहे । अपशकुन पाहे वेडगळ ॥ १ ॥ अत्यंत समय नेणतां अवकळा । येऊं नये बळा सिक धरा ॥ २ ॥ भोजनसमयीं ओकाचा आठव । ठकोनियां जीव कष्टी करी ॥ ३ ॥ तुका ह्मणे किती सांगों उगवून । अभाग्याचे गुण अनावर ॥ ४ ॥

॥ ५६२२ ॥ धर्म तो न कळे । काय झांकितील डोळे॥१॥ जीव भ्रमले या कामें । कैसीं कळों येती वर्मे ॥ २ ॥ विषयांचा माज । कांहीं धरूं नेदी लाज ॥ ३ ॥ तुका ह्मणे लांसी । माया नाचविते कैसी ॥ ४ ॥

॥ ५६२३ ॥ दुर्जनाची जोडी । सज्जनाचे खेंटर तोडी ॥ १ ॥ पाहे निमित्य तें उणें । धांवे छळावया सुनें ॥ २ ॥ न ह्मणे रामराम । मनें वाचे हेंचि काम ॥ ३ ॥ तुका ह्मणे भागा । आली निंदा करी मागा ॥ ४ ॥

॥ ५६२४ ॥ न विचारितां ठायाठाव । काय भुंके तो गाढव ॥ १ ॥ केला तैसा लाहे दंड । खळ अविचारी लंड ॥ २ ॥ करावें लाताळें । ऐसें नेणे कोण्या काळें ॥ ३ ॥ न कळे उचित । तुका ह्मणे नीत हित ॥ ४ ॥

॥ ५६२५ ॥ माहार मातें चपणी भरे । नकळे खरें पुढील ॥ १ ॥ वोंगळ अधमाचे गुण । जातां घडी नलगेचि ॥ २ ॥ श्वान झोळी स्वामिसत्ता । कोप येतां उतरे ॥ ३ ॥ तुका ह्मणे गुमान कां । सांगों लोकां अधमासी ॥ ४ ॥

॥ ५६२६ ॥ वंचुनियां पिंड । माता दान करी लंड ॥ १ ॥ जैसी याची चाली वरी । तैसा अंतरला दुरी ॥ २ ॥ मेला राखे दिस । ज्यालेपण झालें वोस ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । लोभें न पुरेचि सेवा ॥ ४ ॥

॥ ५६२७ ॥ कथाकाळींची मर्यादा सांगतों ते भावें वंदा । प्रीतीनें गोविंदा हेंचि एक आवडे ॥ १ ॥ टाळ वाद्य गीत नृत्य अंतःकरणें प्रेमभरित । वाणिता तो कीर्त तद्भावने लेखावा ॥ २ ॥ नये अळसें मोडूं अंग कथे कानवडे ढुंग । हेळणेचा रंग दावी तो चांडाळ ॥ ३ ॥ तोंडीं विडा माने ताठा थोरपणें घाली गेंठा । चित्त नेदी नामपाठा गोष्टी लावी तो चांडाळ ॥ ४ ॥ कथे इच्छी मान दावूनियां थोरपण । रजा संकोच न लुगडीं सावरी तो चांडाळ ॥ ५ ॥ आपण बैसे बाजेवरी सामान्य हरिच्या दासां धरी तरि तो सुळावरी वाहिजे निश्चयेसी ॥ ६ ॥ येतां न करी नमस्कार कर जोडोनियां नम्र । न ह्मणतां थोर आणिकां खेटी तो चांडाळ ॥ ७ ॥ तुका विनवी जना कथे नाणावें अवगुणा । करा नारायणारूणी समर्थ भावें ॥ ८ ॥

॥ ५६२८ ॥ जन्मांतरीचा परीट न्हावी । जात ठावी त्यानें ते ॥ १ ॥ वाखर जैसा चरचरी । तोंड करी संवदणी ॥ २ ॥ पूर्व जन्म शिखासूत्र । मळ मूत्र अंतरीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे करिती निंदा । धुवटधंदा पुढिलांचा ॥ ४ ॥

॥ ५६२९ ॥ नाम दूषी त्याचें नको दरुषण । विष तें वचन वाटे मज ॥ १ ॥ अमंगळ वाणी नाइकवे कानीं । निंदेची पोहणी उठे तेथें ॥ २ ॥ काय साच लभ्य त्याचिये वचनीं । कोणत्या पुराणीं दिली ग्वाही ॥ ३ ॥

काय आड लावूं त्याचिया तोंडासी । आतां या जिभेसी काय करूं ॥ ४ ॥ तुका म्हणे संत न मनिती त्यांस । घेऊं पाहे ग्रास यमदूत ॥ ५ ॥

॥ ५६३० ॥ कावळियासी नाहीं दया उपकार । काळिमा अंतर विटाळसें ॥१॥ तैसें कुधनाचें जिणें अमंगळ । घाणेरी वोंगळ वदे वाणी ॥ २ ॥ कडु भोंपळ्याचा उपचारें पाक । सेविल्या तिडीक कपाळासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे विष सांडूं नेणे साप । आदरें तें पाप त्याचे ठायीं ॥ ४ ॥

॥ ५६३१ ॥ क्षीर मागे तया रायतें वाढी । पाधानी गधडी ऐशा नांवें ॥ १ ॥ समयो जाणां समयो जाणां । भलतें नाणां भलतेथें ॥ २ ॥ अमंगळ वाणी वदवी मंगळी । अशुभ वोंगळी शोभन ते ॥ ३ ॥ तुका ह्मणे नेणें समयो ठाया ठाव । राहाडी ते वाव नरकाडी ॥ ४ ॥

॥ ५६३२ ॥ ढेंकणासी बाज गड । उतरचढ केवढी ॥ १ ॥ होता तैसा कळों भाव । आला वाव अंतरींचा ॥ २ ॥ बोरामध्यें वसे अळी । अठोळीच भोंवती ॥ ३ ॥ पोटासाठीं वेंची चणे । राजा ह्मणे तोंडें मी ॥४॥ बेडकांनीं चिखल खावा । काय ठावा सागर ॥ ५ ॥ तुका ह्मणे ऐसें आहे । काय पाहे सांत तें ॥ ६ ॥

॥ ५६३३ ॥ हेंदऱ्याचे भरितां कान । हलवी मान भोंक रितें ॥ १ ॥ नाहीं मी येथें सांगों स्पष्ट । भावें नष्ट घेत नाहीं ॥ २ ॥ अवगुणी बाटलें चित्त । तया हित आतळे ना ॥ ३ ॥ तुका ह्मणे फजितखोरा । ह्मणतां बरा उगा रहा ॥ ४ ॥

॥ ५६३४ ॥ नाहीं सरों येत जोडिल्या वचनीं । कवित्वाची वाणी कुशळता ॥ १ ॥ सत्याचा अनुभव वेधी सत्वपणें । अनुभवाच्या गुणें रुचों येतो ॥ २ ॥ काय अगीपाशीं शृंगारिलें चाले । पोटींचें उकले कशापाशीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें करावा उकल । लागे चि ना बोल वाढवूनी ॥ ४ ॥

॥ ५६३५ ॥ लचाळाऱ्या कामा नाहीं ताळावाळा । न कळे ओंगळा उपदेश ॥ १ ॥ वचनचर्येची न कळे चांचणी । ऐसी संघष्टनी अभंगळ ॥ २॥ समय न कळे वेडगळ बुद्धि । विजाती ते शुद्धि चांच चाट ॥ ३ ॥ तुका ह्मणे याचा धिक्कार चि बरा । बहुमति खराहूनि हीन ॥ ४ ॥

॥ ५६३६ ॥ नेणे सुने चोर पाहुणा मागता । देखून भलता भुंकतसे ॥ १ ॥ शिकविलें कांहीं न चले तया । बोलियेले वांयां बोल जाती ॥ २॥श्वा

र ओकुनियां खाय अमंगळ । आपुली ते ढाळ जाऊं नेदी ॥ ३ ॥ वंदूं निंदूं काय दुराचार । खळाचा विचार तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ५६३७ ॥ भेणें पळे डोळसा । न कळे मृत्यू तो सरिसा ॥ १ ॥ कैसी झाली दिशाभुली । न वजातिये वाटे चाली ॥ २ ॥ संसाराची खंती मावळल्या तरी शक्ति ॥ ३ ॥ तुका ह्मणे हीणा । बुद्धि चुकली नारायणा ॥ ४ ॥

॥ ५६३८ ॥ अभिमानाचें तोंड काळें । दावी बळें अंधार ॥ १ ॥ लाभ न्यावा हातोहातीं । तोंडीं माती पाडोनि ॥ २ ॥ लागलीसे पाठी लाज । झालें काज नासाया ॥ ३ ॥ तुका म्हणे कुश्चळ मनीं । विटंबनीं पडिलीं तीं ॥ ४ ॥

॥ ५६३९ ॥ चोराचीया धुडका मनीं । वसे आनीं लंछन ॥ १ ॥ ऐसा आह्मी करणें काय । वरसो न्यायें पर्जन्य ॥ २ ॥ ज्याच्या बैसे खतावरी । ते चुरचुरी दुखवूनि ॥ ३ ॥ तुका ह्मणे ज्याची खोडी । त्याची जोडी त्या पीडी ॥ ४ ॥

॥ ५६४० ॥ बुद्धिहीना उपदेश । तें तें विष अमृतीं ॥ १ ॥ हुंगों नये गोऱ्हवाडी । तेथें जोडी विटाळ ॥ २ ॥ अळसियाचें अंतर कुडें । जैसें मढें निष्काम ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसा हातीं । मज श्रीपती वांचवा ॥ ४ ॥

॥ ५६४१ ॥ आपल्या च स्फुंदें । जेथें तेथें घेती छंदें ॥ १ ॥ पाडिला सत्याचा दुष्काळ । बहू फार त्यासी घोळ ॥ २ ॥ विश्वासाचे माठ । त्याचे कपाळीं तें नाट ॥ ३ ॥ तुका ह्मणे घाणा । मुढा तीर्थी प्रदक्षिणा ॥ ४ ॥

॥ ५६४२ ॥ खळा सदा क्षुद्रीं वृष्टि । करी कष्टी सज्जना ॥ १ ॥ करिती आपुलाले परी । धणीवरी व्यापार ॥ २ ॥ दया संता भांडवल । वेंचि बोल उपकार ॥ ३ ॥ तुका ह्मणे आपुलाळें । उसंतिलें ज्यांणीं तें ॥ ४ ॥

॥ ५६४३ ॥ दुर्जनाची जाती । त्याचे तोंडीं पडे माती ॥ १ ॥ त्याची बुद्धि त्यासी नाडी । वाचे अनुचित बडबडी ॥ २ ॥ पाहें संतांकडे । दोष दृष्टी पाहे भीडे ॥ ३ ॥ उंच निंच नाहीं । तुका ह्मणे खळा कांहीं ॥ ४ ॥

॥ ५६४४ ॥ संतांसी क्षोभवी कोण्या ही प्रकारें । त्याचें नव्हे बरें उभयलोकीं ॥ १ ॥ देवाचा तो वैरी शत्रु दावेदार । पृथ्वी ही थार नेदी तया ॥ २ ॥ संतांपाशीं ज्याचा नुरेचि विश्वास । त्याचे झाले दोष बाळिवंत ॥ ३ ॥ तुका ह्मणे क्षीर वासराच्या अंगे । किंवा धांवे लागें विषमें मारूं ॥ ३ ॥

॥ ५६४५ ॥ उदकीं कालवी शेण मलमूत्र । तो होय पवित्र कासयानें ॥ १ ॥ उद्धारासी ठाव नाहीं भाग्यहीना । विन्मुख चरणा संतांचिया ॥ २ ॥ दुखवी तो बुडे सांगडीचा तापा । अतिशाई पापाचीच मूर्त ॥ ३ ॥ तुका ह्मणे जेव्हां फिरतें कपाळ । तरी अमंगळ योग होतो ॥ ४ ॥

॥ ५६४६ ॥ उकाडा आधीं अंगीं नरकाडी । जातीची जे ओडी तेची चित्तीं ॥ १ ॥कासयानें देखे अंधळा माणिकें । चवीविण फिके वांयां जाय ॥ २ ॥ काय जाणे विष पालटों उपचारें । मुखासी अंतर तोंचि बरें ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय उपदेश वेड्या । संगें होतो रेड्यासवें कष्ट ॥ ४ ॥

॥ ५६४७ ॥ आपुल्याचा भोतचाटी । मारी करंटी पारख्यां ॥ १ ॥ ऐसे जन भुललें देवा । मिथ्या हेवा वाढवी ॥ २ ॥ गळ गिळी आमिषें मासा । प्राण आशा घेतला ॥ ३ ॥ तुका म्हणे बोकडमोहो । धरी पहा हो खाटिक ॥ ४ ॥

॥ ५६४८ ॥ विषय तो मरणसंगीं । नेणे मुटिका अभागी ॥ १ ॥ शास्त्राचा केला लुंडा । तोंडीं पाडियेला धोंडा ॥ २ ॥ अगदीं मोक्ष नाहीं ठावा । काय सांगावें गाढवा ॥ ३ ॥ तुका म्हणे ग्यानगड । सुखें पावो देवा नाड ॥ ४ ॥

॥ ५६४९ ॥ लावूनियां पुष्टी पोर । आणि करकर कथेमाजी ॥ १ ॥ पडा पायां करा विनंती । दवडा हातीं धरोनियां ॥ २ ॥ कुर्वाळूनि बैसे मोहें । प्रेम कां हें नासीतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे वाटे चित्त । करा फजित म्हणऊनि ॥ ४ ॥

॥५६५०॥ ग्रंथाचे अर्थ नेणती हे खळ । बहू अनर्गळ झाले विषयीं ॥१॥ नाहीं भेद म्हूण भलतें चि आचरे । मोकळा विचरे मनासवें ॥२॥ तुका म्हणे विषा नांव तें अमृत । पापपुण्या भीत नाहीं नष्ट ॥ ३ ॥

॥ ५६५१ ॥ मान इच्छी तो अपमान पावे । अमंगळ सवे आभाग्याची ॥१॥ एकाचिये अंगीं दुजियाचा वास । आशा पुढें नाश सिद्ध करी ॥ २ ॥ आधीं फळासी कोठें पावों शके । वासनेची भिकवरी चाली ॥ ३ ॥ तुका ह्मणे राजहंस ढोरा नांव । काय तया द्यावें अळंकाराचें ॥ ४ ॥

॥ ५६५२ ॥ अनुभवें वदे वाणी । अंतर ध्यानीं आपुलें ॥ १ ॥ कैंची चिका दुधचवी । जरी दावी पांढरें ॥ २ ॥ जातीऐसा दावी रंग । बहु जग या नांवें ॥ ३ ॥ तुका ह्मणे खद्योत तें । ढुंगाभोंवतें आपुलिया ॥ ४ ॥

॥ ५६५३ ॥ परपीडक तो आह्मां दावेदार । विश्वीं विश्वंभर ह्मणऊनि ॥ १ ॥ दंडूं त्यासूं बळें नावलोकूं डोळा । राखूं तो चांडाळ ऐसा दुरि ॥ २ ॥ अनाचार कांहीं न साहे अवगुणें । बहु होय मन कासावीस ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझी एकविध सेवा । विमुख ते देवा वाळी चित्तें ॥ ४ ॥

॥ ५६५४ ॥ पुढें जेणें लाभ घडे । तेंचि वेडे नाशिती ॥ १ ॥ येवढी कोठें नागवण । अंधारून विष द्यावें ॥ २ ॥ होणारासी मिळे बुद्धि । नेदी शुद्धी धरूं तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे जना सोंग । दावी रंग आणीक ॥ ४ ॥

॥ ५६५५ ॥ झालों ह्मणती त्याचें मज वाटे आश्चर्य । ऐका नव्हे धीर वचन माझें ॥ १ ॥ शिजलिया अन्ना ग्वाही दांत हात । जिव्हेसी चाखत न कळे कैसें ॥२॥ तापलिया तेलीं बावन चंदन । बुंद एक क्षण शीतळ करी ॥ ३ ॥ पारखी तो जाणे अंतरींचा भेद । मूढजना छंद लावण्यांचा ॥ ४ ॥ तुका ह्मणे कसीं निवडे आपण । शुद्ध मंद हीन जैसें तैसें ॥ ५ ॥

॥ ५६५६ ॥ बाइल तरी ऐसी व्हावी । नरकीं गोवी अनिवार ॥१॥ घडों नेदीं तीर्थयात्रा । केला कुतरा हातसोंका ॥ २ ॥ आपुलीच करवी सेवा । पुजवी देवासारिखें ॥ ३ ॥ तुका ह्मणे गाढव पशु । केला नाशु आयुष्या ॥ ४ ॥

॥ ५६५७ ॥ देवाचिया वस्त्रा स्वप्नींही नाठवी । स्त्रियेसी पाठवी उंच साडी ॥ १ ॥ गाईचें पाळण नयेचि विचारा । अश्वासी खरारा

करी अंगें ॥ २ ॥ लेकराची रास स्वयें धांवे क्षाळूं । न ह्मणे प्रक्षाळूं द्विजपायां ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याच्या तोंडावरि थुंका । जातो यमलोका भोगावया ॥ ४ ॥

॥ ५६५८ ॥ उरा लावी उर आळंगितां कांता । संतासी भेटतां अंग चोरी ॥ १ ॥ अतीत देखोनी होय पाठमोरा । व्याघ्रासी सामोरा जाय वेगीं ॥ २ ॥ द्विजा नमस्कारा मनीं भाव कैंचा । तुर्काचे दासीचा लेंक होय ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुह्मी क्रोधासी न यावें । स्वभावा करावें काय कोणीं ॥ ४ ॥

॥ ५६५९ ॥ राउळासी जातां त्रास मानी मोठा । बैसतो चोहोटां आदरेशीं ॥ १ ॥ न करी स्नान संध्या ह्मणे रामराम । गुरुगुडीचे प्रेम अहर्निशीं ॥ २ ॥ देवाब्राह्मणासी जाईना शरण । दासीचे चरण वंदी भावें ॥ ३ ॥ सुगंध चंदन सांडोनियां माशी । बसे दुर्गंधीशीं अतिआदरें ॥ ४ ॥ तुका ह्मणे अरे ऐक भाग्यहीना । कां रे रामराणा विसरसी ॥ ५ ॥

॥ ५६६० ॥ चिरगुटें घालूनी वाढविलें पोट । गऱ्हवार बोभाट जनांमध्यें ॥ १ ॥ लटिकेंची डोहळे दाखवी प्रकार । दुध स्तनीं पोर पोटीं नाहीं ॥ २ ॥ तुका ह्मणे अंतीं वांझ तेची खरी । फजिती दुसरी जनांमध्यें ॥ ३ ॥

॥ ५६६१ ॥ काय तीं करावीं मोलाचीं माकडें । नाचतातीं पुढें संसाराच्या ॥ १ ॥ झाडा देतेवेळे विचकिती दांत । घेती यमदूत दंडवरी ॥ २ ॥ हात दांत कान हालविती मान । दाखविती जन मानावया ॥ ३ ॥ तुका ह्मणे किती झालीं हीं फजित । मागें नाहीं नीत भारवाही ॥ ४ ॥

॥ ५६६२ ॥ संतांच्या हेळणें बाटलें जें तोंड । प्रत्यक्ष तें कुंड चर्मकाचें ॥ १ ॥ भेसळीचें वीर्य ऐशा अनुभवें । आपुलें परावें नाहीं खळा ॥ २ ॥ संताचा जो शोध करितो चांडाळ । धरावा विटाळ बहु त्याचा ॥३॥ तुका ह्मणे केली प्रज्ञा याच साठीं । कांहीं माझे पोटीं शंका नाहीं ॥४॥

॥ ५६६३ ॥ गोहो यावा गांवा । ऐसे नवस करी आवा ॥ १ ॥ कैचें पुण्य तया गांठीं । व्रतें वेची लोभासाठीं ॥ २ ॥ वाढावें संतान । गृहीं व्हावें धनधान्य ॥ ३ ॥ मागे गारगोटी । परिसाचीये साटोवाटी ॥ ४ ॥ तुका ह्मणे मोल । देउन घेतला सोमवल ॥ ५ ॥

॥ ५६६४ ॥ गुरुपादाग्रींचें जळ। त्यास मानी जो विटाळ ॥ १॥ संतीं वाळिला जो खळ। नरकीं पचे चिरकाळ ॥ २॥ गुरुतीर्थी अनमान। यथासांग मद्यपान ॥ ३ ॥ गुरुअंगुष्ठ न चोखी। मुख घाली वेश्येमुखीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे सांगों किती। मुखीं पडो त्याचे माती ॥ ५ ॥

॥ ५६६५ ॥ स्तुती अथवा निंदा करावी देवाची। अधम तो वेची व्यर्थ वाणी ॥ १ ॥ आइकोनि होती बहिर हे बोल। वेचूनि ते मोल नरका जाती ॥ २ ॥ इह लोकीं थुंका उडे तोंडावरी। करणें अघोरीं वास लागे ॥ ३ ॥ तुका ह्मणे माप वाचेऐसें निकें। भरलें नरकें निंदेसाठीं ॥ ४ ॥

॥ ५६६६ ॥ पुत्र झाला चोर। मायबापा हर्ष थोर ॥ १ ॥ आतां काशासाठीं जोडी। हाट धाटे गुंडगे घडी ॥ २ ॥ ऐते अपाहार। आणूनियां भरी घर ॥ ३ ॥ मानिली निश्चिंती। नरका जावया उभयतीं ॥ ४ ॥ झोडाझोडगीचे पोटीं। फळें बीजें तीं करंटीं ॥ ५ ॥ तुका म्हणे बेव्या। भांडवल नलगे खव्या ॥ ६ ॥

॥ ५६६७ ॥ एवढी अपकीर्ती। ऐकोनियां फजीती ॥ १ ॥ जरि दाविल वदन। थुंका थुंका तो देखोन ॥ २ ॥ काळिमेचें जिणें। जीऊनियां राहे सुनें ॥ ३ ॥ तुका ह्मणे गुण। दरुषणें अपशकुन ॥ ४ ॥

॥ ५६६८ ॥ दावूनियां बंड। पुरे न करी तें भांड ॥ १ ॥ जळो जळो तैसें जिणें। फटमरे लाजिरवाणें ॥ २ ॥ घेतलें तें सोंग। बरवें संपादावें सांग ॥ ३ ॥ तुका ह्मणे धीरें। देव नुपेक्षील खरें ॥ ४ ॥

॥ ५६६९ ॥ काय वृंदावन मोहियेलें गुळें। काय जिरें काळें उपचारिल ॥ १ ॥ तैसी अधमाची जातीच अधम। उपदेश श्रम करावा तो ॥ २ ॥ न कळे विंचासी कुरवाळिलें अंग। आपले ते रंग दावीतसें ॥ ३ ॥ तुका ह्मणे नये पाकासी दगड। शूकरासी गोड जैसी विष्टा ॥ ४ ॥

॥ ५६७० ॥ स्तवूनियां नरा। केला आयुष्याचा मातेरा ॥ १ ॥ नारायणाचिया लोपें। घडलीं अवघींचि पापें ॥ २ ॥ जीव ज्याचें दान। त्याचा खंडूनियां मान ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाणी। आइके त्या दोष कानीं ॥ ४ ॥

॥ ५६७१ ॥ संतां नाहीं मान । देव मानी मुसलमान ॥ १ ॥ ऐसे पोटाचे मारिले । देवा आशा विटंबिलें ॥ २ ॥ घाली लोटांगण । वंदी नीचाचे चरण ॥ ३ ॥ तुका ह्मणे धर्म । न कळे माजल्याचा भ्रम ॥ ४ ॥

॥ ५६७२ ॥ भुंकुनियां सुनें लागे हस्तीपाठी । होऊनि हिंपुटी दुःख पावे ॥ १ ॥ काय त्या मशकें तयाचें करावें । आपुल्या स्वभावें पीड तसे ॥ २ ॥ मातलें बोकड विटवी पंचानना । घेतलें मरणा धरणें तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे संतां पीडितील खळ । घेती तोंड काळें करूनियां ॥ ४॥

॥ ५६७३ ॥ निंबाचिया झाडा साकरेचें आळें । आपली तीं फळें न संडीच ॥ १ ॥ तैसें अधमाचें अमंगळ चित्त । वमन तें हित करून सांडी ॥ २ ॥ परिसाचे अंगीं लाविलें खापर । पालट अंतर नेघे त्याचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे वेळू चंदना संगतीं । काय ते नसती जवळिकें ॥ ४ ॥

॥ ५६७४ ॥ माकडा दिसती कंवटी नारळा । भोक्ता निराळा वरील सारी ॥ १ ॥ एक रस एका तोंडीं पडे माती । आपुलाले नेती विभाग ते ॥ २ ॥ सुनियांसी क्षीर वाढिल्या ओकवी । भोगित्यां पोसवी धणीवरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे भार वागविती मुर्ख । नेतील तें सार परीक्षक ॥ ४ ॥

॥ ५६७५ ॥ किती चोंबाचारें । येथें गोविलीं वेव्हारें ॥ १ ॥ असे बांधविले गळे । होऊं न सकती निराळे ॥ २ ॥ आपलें आपण । केलें कां नाहीं जतन ॥ ३ ॥ तुका ह्मणे खंडदंडें । येरझारीं लपती लंडें ॥ ४ ॥

॥ ५६७६ ॥ जाणिवेच्या भारें चेंपला उर । सदा बुरबुर सरेचिना ॥ १ ॥ किती यांचें ऐकों कानीं । मारिलें घाणीं नाळकरी ॥ २ ॥ मिठेंविण आळणी बोल । कोरडी फोल घसवस ॥ ३ ॥ तुका ह्मणे डेंगा न कळे हित । किती फजित करूं तरी ॥ ४ ॥

॥ ५६७७ ॥ ऐसें ठावें नाहीं मुढा । सोस काकुलती पुढां ॥१ माझीं नका जाळूं भांडीं । पोटीं भय सोस तोंडीं ॥ २ ॥ पातलिया काळ । तेव्हां काय चाले बळ ॥ ३ ॥ संचित ते करी । नरका जाया मेल्यावरी ॥ ४ ॥ परउपकार । न घडावा हा विचार ॥ ५ ॥ तुका ह्मणे लांसी । आतां भेटों नये ऐसी ॥ ६ ॥

॥ ५६७८ ॥ नाहीं देवाचा विश्वास । करी संतांचा उपहास ॥ १ ॥ त्याचे तोंडीं पडे माती । हीन शूकराची जाती ॥ २ ॥ घोकुन अक्षर ।

वाद छळणा करीत फिरे ॥ ३ ॥ ह्मणे देवांसी पाषाण । तुका ह्मणे भावहीन ॥ ४ ॥

॥ ५६७९ ॥ अभक्ताचे गांवीं साधु ह्मणजे काय । व्याघ्रवाडां गाय सांपडली ॥ १ ॥ कसाबाचे आळी मांडिलें प्रमाण । बह्मणाची आण तया कायी ॥ २ ॥ केळी आणि बोरी वसती सेजारी । संवाद कोणे परी घडे येथें ॥ ३ ॥ तुका ह्मणे खीर केली कान्हेळ्याची । शुद्ध गोडी कैची वसे तेथें ॥ ४ ॥

॥ ५६८० ॥ अंगा भरला ताठा । नये वळणी जैसा खुंटा ॥ १ ॥ कैसें न कळे त्या डेंगा । हित आदळलें अंगा ॥ २ ॥ जीव जाते वेळे । भरे लकडा ताठी डोळे ॥ ३ ॥ मुसळाचें धनु । तुका ह्मणे नव्हे अनु ॥ ४ ॥

॥ ५६८१ ॥ संसाराचे धांवे वेठी । आवडी पोटीं केवढी ॥ १ ॥ ह्मगों जातां दगड सांची । अंतरीं ही संकल्प ॥ २ ॥ लाज तेवढी नारायणीं । वांकडी वाणी पोरांपें ॥ ३ ॥ तुका ह्मणे बेशरमा । श्रमावरी पाडिभरू ॥ ४ ॥

॥ ५६८२ ॥ देवें दिला देह भजना गोमटा । तो या झाला भाटा बाधिकेच्या ॥ १ ॥ ताठोनियां मान राहिली वरती । अहंकारा हातीं लवों नल्हे ॥ २ ॥ दास ह्मणावया न वळे रसना । सइरवचना बासे गळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे कोठें ठेवावा विटाळ । स्नानें निर्मळ व्हावयासी ॥ ४ ॥

॥ ५६८३ ॥ देवाचें चरित्र नाठवे सर्वथा । विनोदार्थ कथा गोड वाटे ॥ १ ॥ हातावरी हात हासोनि आफळी । वाजवितां टाळी लाज वाटे ॥ २ ॥ तुका ह्मणे थुंका त्याचे तोंडांवरी । जातो यम पुरी भोगावया ॥ ३ ॥

॥ ५६८४ ॥ खद्योतें फुलविलें रविपुढें ढुंग । साक्षी तंव जग उभयतां ॥ १ ॥ आपल्या आपण नाहीं शोभा येत । चार करी स्फीत दाखवूनि ॥ २ ॥ खाणार ताकाचें असे तें माजीरें । आपणेंचि अधीर कळों येतें ॥ ३ ॥ तुका ह्मणे जळो मैंदाची मवाळी । दावूनियां नळी कापी सुखें ॥ ४ ॥

॥ ५६८५ ॥ सामावे कारण । नाहीं सोसत धरणें ॥ १ ॥ लादी थींके लाजिरवाणी । हीनकमाईची घाणी ॥ २ ॥ पुष्प जवळी नाका । दुर्गंधीच्या नांवें थुंका ॥ ३ ॥ तुका ह्मणे किती । उपदेशहीन जाती ॥ ४ ॥

॥ ५६८६ ॥ दर्पणासी बुजे । नखटें तोंड पळवी लाजे ॥ १ ॥ गुण ज्याचा जो अंतरीं । तोचि त्यासी पीडा करी ॥ २ ॥ चोरा रुचे निशी । देखोनियां विटे शशी ॥ ३ ॥ तुका म्हणे जन । देवा असे भाग्यहीन ॥ ४ ॥

॥ ५६८७ ॥ उपदेश किती करावा खळासी । नावडे तयासी बरें कांहीं ॥ १ ॥ शुद्ध कां वासना नव्हे चांडाळाची । होळी संचिताची केली तेणें ॥ २ ॥ नाहीं भाव मनीं नाइके वचन । आपला आपण उणें घेतो ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्यासी काय व्याली रांड । करी वडबड रिती दिसे ॥ ४ ॥

॥ ५६८८ ॥ रत्नाच्या वोवणी कांचे ऐशा धरी । आव्हेरुनी दुरी अधिकारें ॥ १ ॥ जातिस्वभाव आला डोळ्यां आड । तया घडे नाड न कळतां ॥ २ ॥ कामधेनु देखे जैशा गाईह्मैसी । आणिकांतें ऐसी करोनि-यां ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय बोलोनियां फार । जयाचा वेव्हार तया साजे ॥४॥

॥ ५६८९ ॥ तरी च हीं केलीं । दानें वाईट चांगलीं ॥ १ ॥ एकें एका शोभवावें । केलें कवतुक देवें ॥ २ ॥ काय त्याची सत्ता । सूत्र आणीक चाळिता ॥ ३ ॥ तुका ह्मणे धुरें । डोळे भरिले परि खरें ॥ ४ ॥

॥ ५६९० ॥ अंधळें तें सांगे सांगितल्या खुणा । अनुभव देखणा प्रगट त्या ॥ १ ॥ नांदणुक सांगे वडिलांचें बळ । कैसा तो दुर्बळ सुख पावे ॥ २ ॥ तुका ह्मणे नांदों आपल्या प्रतापें । तयाची लोकांपें स्तुती सांगों ॥ ३ ॥

॥ ५६९१ ॥ जयासी नावडे संतांचा संग । जाणावा तो मांग जन्मां-तरीं ॥ १ ॥ अपवित्र वाचा जातीचा अधम । आचरण धर्म नाहीं जया ॥ २ ॥ मंजुळवदनीं बचनागाची कांडी । शेवटीं विघडी जीवप्राणा ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्याचा पिता नाहीं शुद्ध । तयासी गोविंद अंतरला ॥ ४ ॥

॥ ५६९२ ॥ दोराच्या आधारें पर्वत चढला । पाउलासाटीं केला अपघात ॥ १॥ अष्टोत्तरशें व्याधि ज्या वैद्यें दवडुनी । तो वैद्य मारूनि उ-त्तीर्ण झाला ॥ २ ॥ नव मास माया वाहिलें उदरीं । ते माता चौबो-रीं नग्न केली ॥ ३ ॥ गायत्रीचें क्षीर पिळूनी घेउनी । उपवासी बांधो-नी ताडन करी ॥ ४ ॥ तुका ह्मणे दासां निंदी त्याचें तोंड । पाहतां नरककुंड पूर्वजांसी ॥ ५ ॥

॥ ५६९३ ॥ गाढव शृंगारिलें कोडें । कांहीं केल्या नव्हे घोडें ॥ १ ॥ त्याचें भुंकणें न राहे । स्वभावासी करील काये ॥ २ ॥ श्वान शिबिके बैसविलें । भुंकतां न राहे उगलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे स्वभावकर्म । कांहीं केल्या न सुटे धर्म ॥ ४ ॥

॥ ५६९४ ॥ आवडे सकळां मिष्टान्न । रोग्या विषा त्या समान ॥ १ ॥ दर्पण नावडे तया एका । ठाव नाहीं ज्याच्या नाका ॥ २ ॥ तुका ह्मणे तैशा खळा । उपदेशाचा कांटाळा ॥ ३ ॥

॥ ५६९५ ॥ तुरलों ह्मणुनि धरिला ताठा । सासी चळ झाला फाटा ॥ १ ॥ वांयांविण तुटे दोंड । मान सुख इच्छी भांड ॥ २ ॥ ग्वाहीविण मात । स्थापी आपुली संतत ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसीं कितीं । नरका गेलीं अधोगती ॥ ४ ॥

॥ ५६९६ ॥ अगत्य ज्या नरका जाणें । कीर्तनीं तो वीट मानी ॥ १ ॥ नावडेसा झाला वाप । आलें पाप वस्तीसि ॥ २ ॥ नारायण नाहीं वाचे । ते यमाचे अंदण ॥ ३ ॥ तुका ह्मणे अभक्तासी । माता दासी जग झोडी ॥ ४ ॥

॥ ५६९७ ॥ भोगिली महारें । साची व्याली असे पोरें ॥ १ ॥ करी संतांचा मत्सर । कोपें उभारोनि कर ॥ २ ॥ बीज तैसें फळ । वरी आलें अमंगळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे ठावें । ऐसें झालें अनुभवें ॥ ४ ॥

॥ ५६९८ ॥ पापी तो नाठवी आपुल्या संचिता । ठेवी भगवंतावरी बोल ॥ १ ॥ भेईना करितां पापाचे डोंगर । दुर्जन पामर दुराचारी ॥ २ ॥ नाठवी तो खळ आपुली करणी । देवासी निंदोनि बोलतसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याच्या तोंडा लागो काटी । नाहीं जगजेठी जया चित्तीं ॥ ४ ॥

॥ ५६९९ ॥ कुंकवाची ठेवाठेवी । बोडकादेवी काशाला ॥ १ ॥ दिवस गमा भरा पोट । कां गे नट नटावा ॥ २ ॥ दिमाख हा कोणां दावा । लटकी जीवा चरफड ॥ ३ ॥ तुका ह्मणे झोंडगीं हो । फुंदा कां हो कोरडी ॥ ४ ॥

॥ ५७०० ॥ कळे परि न सुटे गांठी । झालें पोटीं कुपथ्य ॥ १ ॥ अहंकाराचें आंदणें जीव । राहे कींव केली ते ॥ २ ॥ हेंकडाची एकींच

वोढी । तेही खोडी सांगती ॥ ३ ॥ तुका ह्मणे सांगों किती । कांहीं चित्तीं न राहे ॥ ४ ॥

॥ ५७०१ ॥ आड पडे काडी । तरि ते बहुत पाणी खोडी ॥ १ ॥ दुर्जनाचे संगती । बहुतांचे घात होती ॥ २ ॥ एक पडे मासी । तरी ते बहु अन्न नासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे रांड । ऐसी कां ते व्याली भांड ॥ ४ ॥

॥ ५७०२ ॥ खोंकरी आधण होय पाकसिद्धि । हें तों घडों कधीं शकेचि ना ॥ १ ॥ खापराचे अंगीं घसितां परिस । न पालटे कीस काढिलिया ॥ २ ॥ पालथे घागरी रिचविता जळ । तुका ह्मणे खळ तैसे कधी ॥ ३ ॥

॥ ५७०३ ॥ नागलें देखोनि चांगलें बोले । आपुलें वेचूनि साजपुढें खुले ॥ १ ॥ आधमाचे ओंगळ गुण । उचित नेणें तो धर्म कोण ॥ २ ॥ आर्तभूता न घाली पाण्याचा चूळ । न मागे त्यासी घाली साखर गुळ ॥ ३ ॥ एकासी आड पडोनी होंकरी । एकासी देखोनी लपवी भाकरी ॥ ४ ॥ एकासी धड न बोले वाचा । एकासी ह्मणे मी तुझे बांदीचा ॥ ५ ॥ तुका ह्मणे ते गाढव पशु । लाभवीण केला आयुष्यनाशु ॥ ६ ॥

॥ ५७०४ ॥ मायेचा मारिला अंगीं नाहीं घाव । दुःखे तरीं लव धड धडी ॥ १ ॥ न लभे हा काळ न सुटे हातींचा । न बोलवे वाचा खोडावली ॥ २ ॥ न पवे धांवणे न पवेचि लाग । न चलती माग धरावया ॥ ३ ॥ भेणें तरि अंगा लावियेल्या राखा । परी त्यासी वाखा करीतसे ॥४॥ तुका ह्मणे नेदी हाका मारूं देवा । लोकापाठी हेवा लागलासे ॥ ॥

॥ ५७०५ ॥ नाहीं पाक होत उफराटे चाली । बोलिली ते केली व्हावी नीत ॥ १ ॥ नाहीं मानूं येत वाजटाचे बोल । कोरडेच फोल चवी नाहीं ॥ २ ॥ तरुवरा आधीं कोठें आहे फळ । चावटा वरळ ह्मणा त्यासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे किती ठकलीं बापुडीं । गऱ्हा आहे गोडी मांड पुऱ्या ॥ ४ ॥

॥ ५७०६ ॥ अज्ञानाची भक्ति इच्छिती संपत्ती । तयाचिये चित्तीं बोध कैंचा ॥ १ ॥ अज्ञानाची पूजा कामिक भावना । तयाचिया ध्याना देव कैंचा ॥ २ ॥ अज्ञानाचें कर्म फळीं ठेवी मन । निष्काम साधन तया कैंचें ॥ ३ ॥ अज्ञानाचें ज्ञान विषयावरी ध्यान । ब्रह्म सनातन तया कैंचें ॥ ४ ॥ तुका ह्मणे जळो ऐसियाचें तोंड । अज्ञानाचें बंड वाढविती ॥ ५ ॥

॥ ५७०७ ॥ गुळें माखोनियां दगड ठेविला । वर दिसे भला लोकचारी ॥ १ ॥ अंतरीं विषयाचें लागलें पैं पिसें । बाहिरल्या वेषें भुलवी लोकां ॥ २ ॥ ऐशिया दांभिकां कैंची हरिसेवा । नेणेचि सद्भावा कोणे काळीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे येणें कैसा होय संत । विटाळलें चित्त काम क्रोधें ॥ ४ ॥

॥ ५७०८ ॥ आपुल्या पोटासाठीं । करी लोकांचिया गोष्टी ॥ १ ॥ जेणें घातलें संसारीं । विसरला तोचि हरी ॥ २ ॥ पोटा घाली अन्न । न ह्मणे पतीतपावन ॥ ३ ॥ मी कोठील आणि कोण । हें न कळे ज्यालागून ॥ ४ ॥ तुका ह्मणे नरस्तुति । करितो भाट त्रिजगतीं ॥ ५ ॥

॥ ५७०९ ॥ स्वयें आपणाचि रिता । रडे पुढिलाच्या हिता ॥ १ ॥ सखा हें ना तेंसे झालें । बोलणें तितुकें वांयां गेलें ॥ २ ॥ सुखसागरीं नेघे वस्ती । अंगीं ज्ञानपणाची मस्ती ॥ ३ ॥ तुका ह्मणे गाढव लेखा । जेथें भेटेल तेथें ठोका ॥ ४ ॥

॥ ५७१० ॥ आपुली बुटबुट घ्यावी । माझी परताप द्यावी ॥ १ ॥ आपुला मंत्र नव्हे बरा । माझा बईल चुकला मोरा ॥ २ ॥ तुका ह्मणे ऐशा नरा । पारिस न झोंबे खापरा ॥ ३ ॥

॥ ५७११ ॥ रुचे सकळा मिष्टान्न । रोग्या विखाच्या समान ॥ १ ॥ तरी कां तया एका साठीं । कामें अवघीं करणें खोटीं ॥ २ ॥ दर्पण नावडे एका। ठाव नाहीं ज्याच्या नाका॥ ३॥ तुका ह्मणे खळा। उपदेशाचा कांटाळा॥ ४॥

॥ ५७१२ ॥ पोरा लागलीसे चट। धरी वाट देवळाची ॥ १ ॥ सांगितलें नेघे कानीं । दुजें मनीं विठ्ठल ॥ २ ॥ काम घरीं न करी धंदा । येथें सदा दुश्चित ॥ ३ ॥ आमुचे कुळीं नव्हतें ऐसें । हें चि पिसें निवडलें ॥ ४॥ लौकिकाची नाहीं लाज । माझें मज पारिखें ॥ ५ ॥ तुका म्हणे नरका जाणें। या या वचनें दुष्टाचे ॥ ६ ॥

॥ ५७१३ ॥ निंदक तो परउपकारी। काय वर्णूं त्याची थोरी ॥ जो रजकाहूनि भला पारि। सर्व गुणें आगळा ॥ १ ॥ नेघे मोल धुतो फुका । पाप वरच्यावरि देखा ॥ करीतसे साधका । शुद्ध सर ते तिहीं लोकीं ॥ २ ॥ मुख संवदणी सांगाते। अवघें सांठविलें तेथें ॥ जिव्हा साबण निरुतें। दोष काढी जन्माचे ॥ ३ ॥ तया ठाव यमपुरी। वास करणें अघोरीं ॥ त्यासी दंडण करी। तुका म्हणे न्हाणी ते ॥ ४ ॥

॥ ५७१४ ॥ परिसें गे सुनेबाई । नको वेंचूं दूध दहीं ॥ १ ॥ आवा चालिली पंढरपुरा । वेसीपासुनि आली घरा ॥ २ ॥ ऐकें गोष्टी सादर बाळे । करीं जतन फुटकें पाळें ॥ ३ ॥ माझे हातींचा कलवडू । मज-वांचूनि नको फोडूं ॥ ४ ॥ वळवटाक्षिराचें लिपन । नको फोडूं मज वांचून ॥ ५ ॥ उखळ मुसळ जातें । माझें मन गुंतलें तेथें ॥ ६ ॥ भिक्षुक आल्या घरा । सांग गेली पंढरपुरा ॥ ७ ॥ भक्षीं परिमित आहारु । नको फारसी वरो सारू ॥ ८ ॥ सून म्हणे बहुत निकें । तुम्ही यात्रेसि जावें सुखें ॥ ९ ॥ सासूबाई स्वहित जोडा । सर्व मागील आशा सोडा ॥ १० ॥ सूनमुखींचें वचन कानीं । ऐकोनि सासू विवंची मनीं ॥ ११ ॥ सवतीचे चाळे खोटे । म्यां जावेंसें इला वाटे ॥ १२ ॥ आतां कासया यात्रे जाऊं । काय जाऊनि तेथें पाहूं ॥ १३ ॥ मुलें लेंकरें घर दार । माझें येथेंचि पंढरपुर ॥ १४ ॥ तुका म्हणे ऐसे जन । गोवियेले मायेंकरून ॥ १५ ॥

॥ ५७१५ ॥ एक ते गाढव मनुष्याचे वेष । हालविती पुस पुढें दाढी ॥ १ ॥ निंदा हें भोजन जेवण तयांसी । जोडी घरीं रासी पातकांच्या ॥ २ ॥ तुका म्हणे सुखें बैसोनियां खाती । कुंभपाकीं होती नर्कवासी ॥ ३ ॥

॥ ५७१६ ॥ भाग्यालागीं लांचावले । देवधर्म ते राहिले ॥ १ ॥ कथे जातां आळसे मन । प्रपंचाचें मोठें ज्ञान ॥ २ ॥ अखंडप्रीति जाया । नेणे भजनाच्या ठाया ॥ ३ ॥ कथाकीर्त्तन धनाचें । सर्वकाळ विषयीं नाचे ॥ ४ ॥ तुका ह्मणे पंढरिराया । ऐसे जन्मविले वांयां ॥ ५ ॥

॥ ५७१७ ॥ पतिव्रतेची कीर्त्ती वाखाणितां । सिंदळीच्या माथां तिडिक उठे ॥ १ ॥ आमुचें तें आहे सहज बोलणें । नाहीं विचारून केलें कोणी ॥ २ ॥ अंगें उणें त्याच्या बैसे टाळक्यांत । तेणें ठिणग्या बहुत गाळी-तसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मी काय करणें त्यासी । ढका खवंदासी लाग-तसे ॥ ४ ॥

॥ ५७१८ ॥ शिकवणें नाक झाडी । पुढील जोडी कळेना ॥ १ ॥ निरयगांवीं भोग देता । तेथें सत्ता आणिकांची ॥ २ ॥ अवगुणांचा सांटा करी । तेचि धरी जीवासी ॥ ३ ॥ तुका म्हणे जडबुद्धि । कर्मशुद्धी सांडवी ॥ ४ ॥

॥ ५७१९ ॥ वरीवरी बोले युद्धाचिया गोष्टी । परसैन्या भेटी नाहीं झाली ॥ १ ॥ पराव्याचे भार पाहुनियां दृष्टी । कांपतसे पोटीं थरथरां॥२॥ मनाचा उदार रायाचा जुंझार । फिरंगीचा मार मारीतसे ॥ ३ ॥ धन्य त्याची माय धन्य साचा बाप । अंगीं अनुताप हरिनामें ॥ ४ ॥ तुका म्हणे साधु बोले खर्गधार । खोंचतें अंतर दुर्जनाचें ॥ ५ ॥

॥ ५७२० ॥ दासीचा जो संग करी । त्याचे पूर्वज नर्कद्वारीं ॥ १ ॥ ऐसे सांगों जातां जना । नये कोणाचिया मना ॥ २ ॥ वरें विचारूनी पाहें । तुज अंतीं कोण आहे ॥ ३ ॥ तुका म्हणे रांडलेंका । अंतीं जासिल यमलोका ॥ ४ ॥

॥ ५७२१ ॥ अधमाचें चित्त अहंकारी मन । उपदेश शीण तया केला ॥ १ ॥ पापियाचें मन न करी आचार । विधवे शृंगार व्यर्थ केला ॥ २ ॥ अधमाचें चित्त दुश्चित ऐकेना । वांयां सीण मना करूं काय ॥ ३ ॥ गर्दभासी दिली चंदनाची उटी । केशर ललाटीं शुकराच्या ॥ ४ ॥ पतिवंचकेसी सांगतां उदंड । परि तें पाषांड तिचे मनीं ॥ ५ ॥ तुका म्हणे तैसें अभाविका सांगतां । वाउगाचि चित्ता सीण होय ॥ ६ ॥

॥ ५७२२ ॥ पाया झाला नारू । तेथें बांधला कापुरु ॥ तेथें बिबव्याचें काम । अधमासी तों अधम ॥ १ ॥ रुसला गुलाम । धणी करीतो सलाम ॥ तेथें चाकराचें काम । अधमासी तों अधम ॥ २ ॥ रुसली घरची दासी । धणी समजावी तियेसी ॥ तेथें बटकीचें काम । अधमासी तों अधम ॥ ३ ॥ देव्हाऱ्यावरी विंचू आला । देवपूजा नावडे त्याला । तेथें पैजारेचें काम । अधमासी तों अधम ॥ ४ ॥ तुका म्हणे जाती । जातीसाठीं खाती माती॥५॥

॥ ५७२३ ॥ झाली गाढवी दुधाळ । महिमा गाईची पावेल ॥ १ ॥ श्वान झालेंसे चांगलें । तरी कां सांगातें जेवील ॥२॥ झाली सिंदळा चांगली । तरि कां पतिव्रता झाली ॥३॥ तुका म्हणे ऐशा जाति । काय उंचपण पावती ॥४॥

॥ ५७२४ ॥ एक ब्रम्हचारी गाढवा झोंबतां । हाणोनियां लाता पळालें तें ॥ १ ॥ गाढवीहि गेलें ब्रम्हचर्य गेलें । तोंड काळें झालें जगामाजी॥२॥ होणार तैसें झालें हें ना तैसें केलें । तुका म्हणें गेलें वांयां चि तें ॥ ३ ॥

॥ ५७२५ ॥ भक्ति ज्याची थोडी। पूर्ण विषयाची गोडी ॥१॥ तो नरचि नव्हे पाहीं । खर जाणावा तो देहीं ॥ २ ॥ भजन पूजनही नेणे । काय स्वरूपासी जाणे ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याला । भोवंडूनी बाहेर घाला ॥ ४ ॥

॥ ५७२६ ॥ कुटल्याविण नव्हे भांडा । अळसें धोंडा पडतसे ॥ १ ॥ राग नको धरूं मनीं । गांडमणी सांगतों ॥ २ ॥ तरटापुढें बरें नाचे ॥ सुतकाचें मुसळ ॥ ३ ॥ तुका म्हणे काठी सार । करी फार शाहाणें ॥ ४ ॥

॥ ५७२७ ॥ बीजापोटीं पाहे फळ । विध न करितां सकळ ॥ १ ॥ तया मूर्ख म्हणावें वेडें । कैसें तुटेल सांकडें ॥ २ ॥ दाविितिया वाट । वेठी धरूं पाहे चाट ॥ ३ ॥ पुढिल्या उपाया । तुका म्हणे राखे काया ॥ ४ ॥

॥ ५७२८ ॥ जन्मा येऊनि काय केलें । तुवां मुद्दल गमाविलें ॥ १ ॥ कां रे न फिरसी माघारा । अझुनि तरी फजितखोरा ॥ २ ॥ केली गांठोळीची नासी । पुढें भीक चि मागसी ॥ ३ ॥ तुका म्हणे ठाया । जाईं आपल्या आलिया ॥ ४ ॥

॥ ५७२९ ॥ पोटासाठीं खटपट करिसी अवघा वीळ । राम राम म्हणतां तुझी बसली दांतखीळ ॥ १ ॥ हरिचें नाम कदाकाळीं कां रे नये वाचे । म्हणतां राम राम तुझ्या बाचें काय वेचे ॥ २ ॥ द्रव्याचिया आशा तुजला दाही दिशा न पुरती । कीर्तनासी जातां तुझी जड झाली माती ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐशा जीवा काय करूं आतां । राम राम न म्हणे त्याचा गाढव मातापिता ॥ ४ ॥

॥ ५७३० ॥ नाम न वदे ज्याची वाचा । तो लेंक दो बापाचा ॥ १ ॥ हेचि ओळख तयाची । खूण जाणा अभक्ताची ॥ २ ॥ ज्यासी विठ्ठल नाहीं ठावा । त्याचा संग न करावा ॥ ३ ॥ नाम न म्हणे ज्याचें तोंड । तेंची चर्मकाचें कुंड ॥४॥ तुका म्हणे त्याचे दिवशीं ।रांड गेली महारापाशीं ॥ ५ ॥

॥ ५७३१ ॥ जळालें तें बाह्य सोंग । अंतर व्यंग पडिलिया ॥ १ ॥ कारण तें अंतरलें । वाइट भलें म्हणवितां ॥ २ ॥ तांतडीनें नासी । तांतडीनेंच संतोषी ॥ ३ ॥ तुका म्हणे धीर । नाहीं बुद्धि एक स्थिर ॥४ ॥

॥ ५७३२ ॥ वाघाचा कालभूत दिसे वाघाऐसा । परी नाहीं दशा त्याच अंगीं ॥ १ ॥ बाहेरील रंग निवडी कसोटी । संघष्टणें भेटी आपोआप ॥ २ ॥सिकाविलें तैसें नाचावें माकडें । न चले त्यापुढें युक्ति कांहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे करी लटिक्याचा सांटा । फजित तो खोटा शीघ्र होय ॥ ४ ॥

॥ ५७३३ ॥ सिंदळीचे सोर चोराची दया । तो ही जाणा तया संवसर्गी ॥ १ ॥ फुकासाटीं भोगे दुःखाचा तो वांटा । उभारोनि कांटा वाटेवरी ॥ २ ॥ सर्प पोसूनियां दुधाचा ही नास । केलें थीता विष

अमृताचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे यासी न करितां दंडण । पुढिल्या खंडण नव्हे दोषा ॥ ४ ॥

॥ ५७३४ ॥ देवाचें भजन कांरे न करिसी । अखंड हव्यासीं पीडतोसी ॥ १ ॥ देवासी शरण कांरे न वजेवे तैसा । बक मीना जैसा मनुष्यालागीं ॥ २ ॥ देवाचा विश्वास कांरे नाहीं तैसा । पुत्रस्नेहें जैसा गुंतलासी ॥ ३ ॥ कांरे नाहीं तैसी देवाची हे गोडी । नागवूनि सोडी पत्नी जैसी ॥ ४ ॥ कांरे नाहीं तैसे देवाचे उपकार । माया मिथ्या भार पितृपूजना ॥ ५ ॥ कांरे भय वाहासी लोकांचा धाक । विसरोनि एक नारायण ॥ ६ ॥ तुका ह्मणे कांरे घातलें वांयां । अवघें आयुष्य जाया भक्तिविण ॥ ७ ॥

॥ ५७३५ ॥ दुबळें सदैवा । ह्मणे नागवेल केव्हां ॥ १ ॥ आपणासारिखें त्या पाहे । स्वभावासी करिल काये ॥ २ ॥ मूढ सभे आंत । इच्छी पंडितांचा घात ॥ ३ ॥ गांढें देखुनि शुरा । उगें करितें बुरबुरा ॥ ४ ॥ आणिकांचा हेवा । न करीं शरण जाईं देवा ॥ ५ ॥ तुका ह्मणे किती । करूं दुष्टाची फजिती ॥ ६ ॥

॥ ५७३६ ॥ ऐसी एकां अटी । रीतीं सिणती करंटीं ॥ १ ॥ साच आपुल्या पुरतें । करून नेघेती कां हितें ॥ २ ॥ कांहीं वेचितील वाणी । निरर्थक चि कारणीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । कांहीं समर्पुनि सेवा ॥ ४ ॥

॥ ५७३७ ॥ चालिले सोबती । काय मानिली निश्चिती ॥ १ ॥ काय करिसी एकला । काळ सन्निध पातला ॥ २ ॥ कांहीं सावध तो बरवा । करीं आपुला काढावा ॥ ३ ॥ चालिले अगळे । हळु च कान केश डोळे ॥ ४ ॥ वोसरले दांत । दाढा गडवडल्या आंत ॥ ५ ॥ एकली तळमळ । जिव्हा भलते ठायीं लोळे ॥ ५ ॥ तुका म्हणे यांणीं । तुझी मांडिली घालणी ॥ ७ ॥

॥ ५७३८ ॥ सरे आम्हांपाशीं एक शुद्धभाव । नाहीं तरी वाव उपचार ॥ १ ॥ कोण मानी वरी रसाळ बोलणें । नाहीं झाली मनें ओळखी तों ॥ २ ॥ तुका म्हणे आम्हां जाणीवेचें दुःख । न पाहों त्या मुख दुर्जनाचें ॥ ४ ॥

॥ ९७३९ ॥ लांव धांवे पाय चोरी । भरोवरी जनाच्या ॥ १ ॥ आतां कैसें होय यावें । भिजलां काचें राहिलें ॥ २ ॥ खाय ओंकीं वेळोवेळां । कैसी कळा राहेल ॥ ३ ॥ तुका म्हणे भावहीण । त्याचा सीण पाचावा ॥ ४ ॥

॥ ९७४० ॥ प्रपंचाची पीडा सोसीतो अघोरी । जया क्षणभरी नाम नये ॥ १ ॥ नाम नाठवितो आत्मया रायाचें । धिग जिणें त्याचें भवा मूळ ॥ २ ॥ मूळ तें पापाचें आचरण तयाचें । नाहीं राघवाचें स्मरण त्या ॥ ३ ॥ स्मरण भजन नावडे जयासी । आंदणीया दासी यमदूत ॥ ४ ॥ चिंतन रामाचें न करी दोषी । एकांत तयासी बोलों नये ॥ ५ ॥ नये त्याचा संग धरूं म्हणे तुका । धरितां पातका वांटेकरी ॥ ६ ॥

॥ ९७४१ ॥ कोणा चिंता आड । कोणा लोकलाज नाड ॥ १ ॥ कैचा राम अभागिया । करी कटकट वांयां ॥ २ ॥ स्मरणाचा राग । क्रोधें विटाळलें अंग ॥ ३ ॥ तुका म्हणे जडा । काय चाले या दगडा ॥ ४ ॥

॥ ९७४२ ॥ विती येवढेंसें पोट । केवढा बोभाट तयाचा ॥ १ ॥ जळो याची विटंबना । भूक जना नाचवी ॥ २ ॥ अभिमाना सिरीं भार । झाले खर तृष्णेचे ॥ ३ ॥ तुका म्हणे नरका जावें । हा चि जीवें व्यापार ॥ ४ ॥

॥ ९७४३ ॥ देखोवेखीं करिती गुरु । नाहीं ठाउका विचारू ॥ १ ॥ वर्म तें न पडे ठायीं । पांडुरंगाविण कांहीं ॥ २ ॥ शिकों कळा शिकों येती । प्रेम नाहीं कोणां हातीं ॥ ३ ॥ तुका म्हणे सार । भक्ति नेणती गव्हार ॥ ४ ॥

॥ ९७४४ ॥ कोंडियाचें गोरेपण । तैसें अहंकार ज्ञान ॥ १ ॥ त्यासि अंतरीं रिझे कोण । जवळीं जातां चिळसवाण ॥ २ ॥ प्रेतदेह गौरविलें । तैसें विटंबवाणें झालें ॥ ३ ॥ तुका म्हणे खाणें विष्ठा । तैशा देहबुद्धि चेष्टा ॥ ४ ॥

॥ ९७४५ ॥ बाईल चालिली माहेरा । संगें दिधला म्हातारा ॥ १ ॥ सिधा सामग्री पोटाची । सवें स्वारी बइलाची ॥ २ ॥ जातां पाडिली ढोरानें । सिव्या देती अन्योविन्यें ॥ ३ ॥ न सावरी आपणातें । नग्न सावलें वरतें ॥ ४ ॥ फजित केलें जनलोकीं । मेला म्हणे पडे नरकीं ॥ ५ ॥ गोह्याची हे गेली लाज । गांजितां कां तुम्ही मज ॥ ६ ॥ तुका म्हणे जनीं । छी थू केली विटंबणी ॥ ७ ॥

॥ ५७४६ ॥ काय देवापाशीं उणें । हिंडे दारोदारीं सुनें ॥ १ ॥ करी अक्षरांची आटी । एके कवडीच साटीं ॥ २ ॥ निंदी कोणा स्तवी । चिंतातुर सदा जीवीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे भांड । जळो जळो त्याचें तोंड ॥४॥

॥ ५७४७ ॥ द्रव्य असतां धर्म न करी । नागविला राजद्वारीं ॥ १ ॥ माय त्यासि व्याली जेव्हां । रांड सटवी नव्हती तेव्हां ॥ २ ॥ कथाकाळीं निद्रा लागे । कामीं श्वानापरी जागे ॥ ३ ॥ भोग स्त्रियेसि देतां लाजे । वस्त्र दासीचें घेउनि निजे ॥ ४ ॥ तुका ह्मणे जाण । नर गाढवाहुनि हीन ॥ ४ ॥

॥ ५७४८ ॥ संताचे गुण दोष आणितां या मना । केलिया उगाणा सुकृताचा ॥ १ ॥ पिळोनियां पाहे पुष्पाचा परिमळ । चिरोनि केळी केळ गाढव तो ॥ २ ॥ तुका ह्मणे गंगे अग्नीसि विटाळ । लावी तो चांडाळ दुःख पावे ॥ ३ ॥

॥ ५७४९ ॥ चुंबळीचा करी चुंबळीशीं संग । अंगीं वसे रंग क्रियाहीन ॥ १ ॥ बीजा ऐसें फळ दावी परिपाकीं । परिमळ लौकिकीं जाती ऐसा ॥ २ ॥ माकडाच्या गळां रत्न कुळांगना । सांडुनियां सुना विदी धुंदी ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसा व्याली ते गाढवी । फजिती ते व्हावी आहे पुढे ॥ ४ ॥

॥ ५७५० ॥ नको बोलों भांडा । खीळ घालुन बैस तोंडा ॥ १ ॥ ऐक विठोबाचे गुण । करीं सादर श्रवण ॥ २ ॥ प्रेमसुखा आड । काय वाजतें चाभाड ॥ ३ ॥ तुका ह्मणे हिता । कां रे नागवसी थीता ॥ ४ ॥

॥ ५७५१ ॥ कथेचा उलंघ तो अधमां अधम । नावडे ज्या नाम ओळखा तो ॥ १ ॥ कासया जीऊन झाला भूमी भार । अनउपकार माते कुंसी ॥ २ ॥ निद्रेचा आदर जागरणीं वीट । साचे पोटीं कीट कुपथ्याचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे दोन्ही बुडविलीं कुळें । ज्याचें तोंड काळें कथेमाजी ॥ ४ ॥

॥ ५७५२ ॥ जयाचिये वाचे नये हा विठ्ठल । साचे मज बोल नावडती ॥ १ ॥ शत्रु तो म्यां केला न ह्मणें आपुला । जो विन्मुख विठ्ठला सर्वभावें ॥ २ ॥ जयासी नावडे विठोबाचें नाम । तो जाणा अधम तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ५७५३ ॥ भ्रतारेंसीं भार्या बोले गुज गोष्टी । मज ऐसी कष्टी नाहीं दुजी ॥ १ ॥ अखंड तुमचें धंद्यावरी मन । माझें तों हेळण करिती सर्व ॥ २ ॥ जोडितसां तुह्मी खाती हेरेंचोरें । माझीं तंव पोरें हळहळीती ॥ ३ ॥ तुमची व्याली माझे डाई हो पेटली । सदा दुष्ट बोली सोसवेना ॥ ४ ॥ दुष्टवृत्ति नंदुली सदा द्वेष करी । नांदों मी संसारीं कोण्या सुखें ॥ ५ ॥ भावा दीर कांहीं धड हा न बोले । नांदों कोणा खालें कैसी आतां ॥ ६ ॥ माझ्या अंगसंगें तुह्मांसी विश्रांति । मग धडगति नाहीं तुमची ॥ ७ ॥ ठाकते ठमकते जीव मुटी धरूनि । परि तुम्ही अजूनि न धरा लाज ॥८॥ वेगळे निघतां संसार करीन । नाहीं तरी प्राण देतें आतां ॥ ९ ॥ तुका ह्मणे झाला कामाचा अंकित । सांगे मनोगत तसा वर्ते ॥ १० ॥

॥ ५७५४ ॥ कामाचा अंकित कांतेतें प्रार्थित । तूं कां हो दुश्चित निरंतर ॥ १ ॥ माझीं मायबापें बंधु हो बहिण । तुज करी सीण सांगीन मी ॥ २ ॥ त्यांचें जरि तोंड पाहेन मागुता । तरि मज हत्या घडो तुझी ॥ ३ ॥ सकाळ उठोन वेगळा निघेन । वाहातों तुझी आण निश्चयेंसी ॥ ४ ॥ वेगळें निघतां घडीन दोरे चुडा । तूं तंव माझा जोडा जन्माचा कीं ॥ ५ ॥ ताईत सांकळी गळांचि दुलडी । बाजुबंदजोडी हातसर ॥ ६ ॥ वेणीचे जे नग सर्व ही करीन । नको धरूं सीण मनीं कांहीं ॥ ७ ॥ नेसावया साडी सेलारी चुनडी । अंगींची कांचोळी जाळिया फुलें ॥ ८ ॥ तुका ह्मणे केला रांडेनें गाढव । मनासवें धांव घेतलीसे ॥ ९ ॥

॥ ५७५५ ॥ संत देखोनियां सयें दृष्टी टाळी । आदरें न्याहाळी परस्त्रीसी ॥ १ ॥ वीट ये कर्णासी संतवाक्यामृता । स्त्रीशब्द ऐकतां निवे कर्ण ॥ २ ॥ कथेमाजी निज वाटे निसक्षणीं । स्त्रियेचे कीर्तनीं प्रेमें जागे ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुह्मी क्रोधासी न यावें । स्वभावा करावें काय कोणीं ॥ ४ ॥

॥ ५७५६ ॥ काय नाहीं लवत झाडें । विसरे वेडें देहभाव ॥ १ ॥ जया न फळे उपदेश । धस ऐसा त्या नांवें ॥२॥ काय नाहीं असत जड । दगड तो अबोलणा ॥ ३ ॥ तुका ह्मणे कुचर दाणा । तैसा ह्मणा डेंग हा ॥ ३ ॥

॥ ५७५७ ॥ पवित्र तें कुळ पावन तो देश । जेथें हरिचे दास घेती जन्म ॥ १ ॥ कर्मधर्म त्याचे झाला नारायण । त्याचेनी पावन तिन्ही लो-

क ॥ २ ॥ वर्णअभिमानें कोण झाले पावन । ऐसें द्या सांगून मजपाशीं ॥ ३ ॥ अंत्यजादि योनि तरल्या हरिभजनें । तयाचीं पुराणें भाट झालीं ॥ ४ ॥ वैश्य तुळाधार गोरा तो कुंभार । धागा हा चांभार रोहिदास ॥ ५ ॥ कबीर मोमीन लतिफ मुसलमान । सेना न्हावी जाण विष्णुदास ॥ ६ ॥ कान्होपात्र खोदु पिंजारी तो दादु । भजनीं अभेदू हरिचे पायीं ॥ ७ ॥ चोखामेळा बंका जातीचा माहार । त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी ॥ ८ ॥ नामयाची जनी कोण तिचा भाव । जेवी पंढरीराव तियेसवें ॥ ९ ॥ मैराळा जनक कोण कुळ त्याचें । महिमान तयाचें काय सांगों ॥ १० ॥ यातायातीधर्म नाहीं विष्णुदासा । निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं ॥ ११ ॥ तुका ह्मणे तुह्मी विचारावे ग्रंथ । तारिले पतित नेणों किती ॥ १२ ॥

॥ ५७५८ ॥ पर्वकाळीं धर्म न करी नासरी । खर्ची राजद्वारीं द्रव्यराशी ॥ १ ॥ सोइऱ्यासी करी पाहुणेर बरा । कांडवी ठोंबरा संतांलागीं ॥ २ ॥ बाइलेचीं सर्व आवडीनें पोसी । मातापितरांसी दवडोनी ॥ ३ ॥ श्राद्धीं कष्टी होय सांगतां ब्राह्मण । गोवार मागून सावडीतो ॥ ४ ॥ नेतो पानें फुलें वेश्येला उदंड । ब्राह्मणासी खांड नेदी एक ॥ ५ ॥ हातें मोऱ्या शोधी कष्ट करी नाना । देवाच्या पूजना कांटाळतो ॥ ६ ॥ सारा वेळ धंदा करितां श्रमेना । साधूच्या दर्शना जातां कुंथे ॥ ७ ॥ हरिच्या कीर्तनीं गुंगायासि लागे । येरवीं तो जागे उगलाचि ॥ ८ ॥ पुराणीं बैसतां नाहीं रिकामटी । खेळतो सोंगटी अहोरात्रीं ॥ ९ ॥ देवाच्या विभुती न पाहे सर्वथा । करी पानवथा नेत्रभिक्षा ॥ १० ॥ गाईला देखोनी बदबदां मारी । घोड्याची चाकरी गोड लागे ॥ ११ ॥ ब्राह्मणाचें तीर्थ घेतां त्रास मोटा । प्रेमें घेतो घोंटा घटघटां ॥ १२ ॥ तुका ह्मणे ऐसे प्रपंचीं गुंतले । जन्मोनि मुकले विठोबासी ॥ १३ ॥

॥ ५७५९ ॥ आपुल्या पोटासाठीं लोकांची प्रौढी वाणी । संतांची वदनीं निंदा करी ॥ १ ॥ पोटा घातलें जेणें अन्न । न ह्मणे पतितपावन ॥ २ ॥ जेणें घातलें संसारीं । विसरला तया हरी ॥ ३ ॥ मी कोठील आणि कोण । हें न कळे जयालागून ॥ ४ ॥ तुका म्हणे नरस्तुती । करितो भाट त्रिजगतीं ॥ ४ ॥

॥ ५७६० ॥ नीत सांडोनि अनीत चाले। भंड उभंड भलतें चि बोले ॥ १ ॥ सांत कोणाचें काय वा गेलें । ज्याचें तेणें अनहित केलें ॥ २ ॥ ज्यासि वंदावें त्यासीं निंदी । मैत्री सांडोनि होतसे द्वंदी ॥२ ॥ आन यातीचे संगती लागे । संतसज्जनामध्यें ना वागे ॥ ३ ॥ केल्याविण पराक्रम सांगे । जेथें सांगे तेथें चि भीक मागे ॥ ४ ॥ करी आपुला चि संभ्रम। परि पुढें कठीण फार यम ॥ ५ ॥ तुका ह्मणे कांहीं निसनेम । चित्तीं न धरी तो अधम ॥ ६ ॥

॥ ५७६१ ॥ उभय भाग्यवंत तरीच समान । स्थळीं समाधान तरीच राहे ॥ १ ॥ युक्तीचें गौरव नमतां जिव्हाळा । सांचवणी जळा परी नाश ॥ २ ॥ लोखंडा परीस ज्ञानिया तो शठ । नांवाचा पालट दगड खरा॥ ३ ॥ तुका ह्मणे अवघे विनोदाचे ठाव । एकात्मक भाव नाहीं तेथें ॥ ४ ॥

॥ ५७६२ ॥ तुळसीवृंदावनीं उपजला कांदा । नावडे गोविंदा कांहीं केल्या ॥ १ ॥ तैसे वंशामध्यें झाले जे मानव । जाणावे दानव अभक्त ते ॥ २ ॥ केवळ्यामधील निर्गंध कणसें । तैशीं तीं माणसें भक्तिहीन ॥ ३ ॥ तुका ह्मणे जेवीं चंदनांतील आळी । न चढे निढळीं देवाचिया ॥ ४ ॥

॥ ५७६३ ॥ अल्प विद्या परि गर्वशिरोमणि । मजहुनि ज्ञानी कोण आहे ॥ १ ॥ अंगीं भरे ताठा कोणासी मानीना। साधूची हेळणा स्वयें करी ॥ २ ॥ सज्जनाच्या देहीं मानी जो विटाळ। त्रैलोकीं चांडाळ तो चि एक ॥ ३ ॥ संतांची जो निंदा करी मुखीं जप । खतेलें तें पाप वज्रलेप ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसे मावेचे मइंद । त्यांपाशीं गोविंद नाहीं नाहीं ॥ ५ ॥

॥ ५७६४ अशाबद्ध वक्ता । भय श्रोतियांच्या चित्ता ॥ १ ॥ गातो तेंचि नाहीं ठावें । तोंड वासी कांहीं द्यावें ॥ २ ॥ झालें लोभाचें मांजर । भीक मागे दारोदार ॥ ३ ॥ माप आणि गोणी । तुका ह्मणे रितीं दोन्ही ॥ ४ ॥

॥ ५७६५ ॥ संतचरणीं नाहीं गोडी । ज्यासी विषयीं आवडी ॥ १ ॥ त्यासी कैंचा भेटे देव । संतचरणीं नाहीं भाव ॥ २ ॥ संतसेवेसी आंग चोरी। दृष्टि न पडो तयावरी ॥ ३ ॥ पाहे गुणदोष संताचे । जळो काळें तोंड त्याचें ॥ ४ ॥ तुका ह्मणे संतसेवा । आमुच्या पूर्वजांचा ठेवा ॥ ५

॥ ५७६६ ॥ जेवितां ही धरी । नाक हागतिया परी ॥ १ ॥ ऐसिया-
चा करी चाळा । आपुली च अवकळा ॥ २ ॥ सांडावें मांडावें । काय ऐसें
नाहीं ठावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे करी । ताका दुधा एक सरी ॥ ४ ॥

॥ ५७६७ ॥ माकडें मुठीं धरिले फुटाणे । गुंतले ते नेणे हात
तेथें ॥ १ ॥ काय तो तयाचा लेखावा अन्याय । हित नेणे काय
आपुलें तें ॥ २ ॥ शुकें नळिकेशीं गोवियेले पाय । विसरोनि जाय पक्ष
दोन्ही ॥३॥ तुका ह्मणे एक ऐसे पशुजीव । न चले उपाव कांहीं तेथें॥४॥

॥ ५७६८ ॥ मांडे पुऱ्या मुखें सांगों जाणे मात । तोंडीं लाळ हात
चोळी रिते ॥ १ ॥ ऐसियाच्या गोष्टी फिक्या मिठेंविण । रुचि नेदी
अन्न चवी नाहीं ॥ २ ॥ बोलों जाणे अंगीं नाहीं शूरपण । काय तें वचन
जाळावें तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे बहुतोंडे जे वाचाळ । तेंग तें च मूळ ल-
टिक्याचें ॥ ४ ॥

॥ ५६६९ ॥ साकरेच्या गोण्या बैलाचिये पाठीं । तयासी सेवटीं
करबाडें ॥१॥ मालाचे पैं पेटे वाहताती उंटें । तयालागीं कांटे भक्षावया ॥२॥
वाउगा हा धंदा आशा वाढविती । बांधोनियां देती यमा हातीं ॥ ३ ॥
ज्यासी असे लाभ तो चि जाणे गोडी । येर तीं बापुडीं सिणलीं वांयां
॥ ४ ॥ तुका ह्मणे शहाणा होईरे गव्हारा । चौऱ्यांशीचा फेरा फिरों
नको ॥ ५ ॥

॥ ५७७० ॥ येऊनि नरदेहा झांकितील डोळे । बळें चि अंधळे होती
लोक ॥ १ ॥ उजडासरसी न चलती वाट । पुढील बोभाट जाणोनियां
॥ २ ॥ बहु फेरे आले सोसोनि वोळसा । पुढें नाहीं ऐसा लाभ मग
। ३ ॥ तुका ह्मणे जाऊं सादावीत वाट । भेटे तरी भेटो कोणी तरी ॥ ४ ॥

॥ ५७७१ ॥ काय ऐसी वेळ । वोडवली अमंगळ ॥ १ ॥ आजि
दुखवलें मन । कथाकाळीं झाला सीण ॥ २ ॥ पापाचिया गुणें । सांचिया
वेळे दर्षणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे कानीं । घालुं आले दुष्टवाणी ॥ ४ ॥

॥ ५७७२ ॥ विठ्ठल मुक्तिदाता । नव्हे मरो हें बोलता ॥ १ ॥ मज
न साहावे कानीं । विष उत्तर लागे मनीं ॥ २ ॥ हरिकथेतें धिक्कारी ।
शत्रु माझा तो वैरी ॥ ३ ॥ सुना काळतोंडा । जो या देवा ह्मणे धोंडा
॥ ४ ॥ अहं ह्मणे ब्रह्म । नेणे भक्तीचें तें वर्म ॥ ५ ॥ तुका ह्मणे क्षण ।
नको तयाचें दर्षण ॥ ६ ॥